www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी

# युवक आधार

संपादक - संतोष शिवदास आमले

मुख्य संपादक - भारती आमले उपसंपादक - श्री विलास गायकवाड कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे निवासी संपादक- श्री राकेश पाटील सह संपादक - श्री मुकुंद कांबळे महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : 3 अंक : ६१ रविवार, ०९ नोव्हेंबर २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




## गुन्ह्याची माहिती न दिल्यास विजयी उमेदवारही ठरणार अपात्र; सुप्रीम कोर्टाचा निर्णय

**दैनिक युवक आधार**
**नवी दिल्ली**

कोणत्याही उमेदवाराने त्याच्या निवडणूक उमेदवारी अर्जात कोणत्याही गुन्हेगारी शिक्षेची माहिती लपवली (जरी ती उच्च न्यायालयाने रद्द केलेली असली तरीही) तर उमेदवार विजयी असला तरी त्याला अपात्र ठरवले जाईल, असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी दिला. बिहार विधानसभा निवडणुकीच्या दरम्यान आलेला या निर्णयामुळे राजकीय पक्षांना मोठा धक्का बसला आहे.मध्य प्रदेश राज्यातील भिकनगाव येथील नगरसेविका पूनम यांच्या प्रकरणात हा निर्णय दिला आहे. 'नेगोशिएबल इंस्ट्रूमेंट्स ॲक्ट १८८१'च्या कलम १३८ अंतर्गत चेक बाऊन्स झाल्याबद्दल ट्रायल कोर्टाने तिला एक वर्षाची शिक्षा सुनावली आहे. उच्च न्यायालयाने नंतर शिक्षा रद्द केली असली, तरी पूनमने तिच्या उमेदवारी अर्जात त्याचा उल्लेख केला नाही, जिल्हा सत्र न्यायालयाने तिची उमेदवारी रद्द केली आहे. ज्याच्या विरोधात तिने सुप्रीम कोर्टात अपील केले.

**न्यायाधीश काय म्हणाले?**



न्या. पी.एस. नरसिंह आणि न्या. अतुल एस. चांदूरकर यांच्या खंडपीठाने गुरुवारी ही याचिका (एसएलपी) फेटाळून लावत म्हटले की, नामांकन पत्रात दोषसिद्धी जाहीर न करणे हे मतदारांच्या हक्कांचे थेट उल्लंघन आहे. केवळ शिक्षा रद्द झाली आहे त्यामुळे हे प्रकरण लपविण्याचा अधिकार देत नाही. प्रतिज्ञापत्रात मागील काही गुन्ह्यात दोषी असल्याचा उल्लेख न करणे हे मतदारांच्या अधिकारांचे उल्लंघन आहे. शिक्षा रद्द करण्यात आली किंवा त्याला स्थगिती देण्यात आली याचा अर्थ हा नाही की प्रतिज्ञापत्रात त्याचा उल्लेख टाळवा, असे खंडपीठाने म्हटले आहे.

## शिक्षणामुळेच व्यक्तीचा; समाजाचा आणि देशाचा विकास घडतो - केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

**दैनिक युवक आधार**
**सहसंपादक मुकुंद कांबळे**

**भुवनेश्वर :** महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले.त्यांनी शिका संघटीत व्हा आणि संघर्ष करा असा संदेश दिला. शिक्षणामुळे ज्ञानार्जनामुळे व्यक्तीचा विकास होतो.व्यक्तीच्या विकासातुन समाजाचा आणि समाजाच्या विकासातून देशाचा विकास घडतो. शिक्षणामुळे आणि ज्ञानार्जनामुळे व्यक्तीमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन वाढतो.विज्ञान आणि शिक्षणाचा प्रसार केला पाहिजे.

गरिबीचा उद्धार शिक्षणातुनच होतो. शिक्षण हे वाघीणीच दुध आहे. जो ते प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही.शिक्षणाची कास धरा.शिक्षण आणि विज्ञानाचा प्रसार करा.असे आवाहन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी केले.



भुवनेश्वर मधील कलिंग इन्सटुट ऑफ इंडस्ट्रीयल टेकॉनोलॉजी (किट) या विद्यापिठाच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शना करताना ना.रामदास आठवले बोलत होते.कलिंग विद्यापिठात केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांना खास विद्यापिठाने प्रमुख अतिथी म्हणुन निमत्रीत केले होते. कलिंग विद्यापिठाला ना.रामदास आठवले यांनी भेट दिली.कलिंग विद्यापिठातील विद्यार्थ्यांशी संवाद साधुन मार्गदर्शन केले. कलिंग विद्यापिठाचे संस्थापक माजी. खासदार अच्युता सामंता हे उपस्थित होते.

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी गोरगरिब विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी पिपल्स एज्यकेशन सोसायटी ही संस्था 1945 रोजी स्थापन केली आहे. या पिपल्स एज्यकेशन सोसायटीच्या देशभरातील महाविद्यालयामध्ये लाखो पेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षणाचा लाभ घेत आहेत.या संस्थेतून अनेक विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतले आणि घडले आहेत.

अच्युता सामंत यांनी ही भुवनेश्वर मध्ये कलिंग विद्यापिठ स्थापन करुन शिक्षणाचा प्रसार करण्याचे चांगले काम करित आहेत.या शिक्षण क्षेत्रातील योगदाना बद्दल आपण त्यांचा येत्या 25 जानेवारी 2026 रोजी दुबई मध्ये महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करणार आहोत.त्या पुरस्कार सोहळयात दुबई येथे उपस्थित राहण्याचे निमंत्रण ना.रामदास आठवले यांनी अच्युता सामंता यांना यावेळी जाहिरपणे दिले.

कलिंग विद्यापिठाला ज्या काही अडचणी येतील त्यांना सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन ना.रामदास आठवले यांनी यावेळी दिले.विद्यार्थ्यांनी शिक्षण घेताना महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा आदर्श घेतला पाहिजे. शिक्षण घेताना विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन ही विकसीत केला पाहिजे असे आवाहन ना.रामदास आठवले यांनी केले.यावेळी ना.रामदास आठवले यांचा भव्य सत्कार कलिंग विद्यापिठाच्या वतीने करण्यात आला.

## 'जिव्हाळ्याची भिंत' उभारणाऱ्या सुरज हेमके यांचा आमदार बाळासाहेबजी मांगूळकर यांच्या हस्ते सन्मान!

### यवतमाळच्या मातीतून समाजसेवेचा 'सूरज' तळपला!

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी तालुका प्रतिनिधी**
**महेश पेन्दोर**

भारतीय स्वयंसेवी महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सामाजिक सेवाभावी संस्था स्नेह मिलन कार्यक्रमात यंदा एका अशा समाजसेवकाचा गौरव झाला, ज्यांनी भुकेल्यांसाठी अक्षरशः 'जिव्हाळ्याची भिंत' आणि 'अन्नदान छत्र' उभे केले आहे.

यवतमाळ विधानसभेचे लोकप्रिय आमदार बाळासाहेबजी मांगूळकर यांच्या शुभहस्ते, सुरज हेमके यांचा 'सत्कार मूर्ती' म्हणून विशेष सन्मान करण्यात आला. यवतमाळच्या मातीत सेवेचा आदर जपणाऱ्या हेमके यांना हा बहुमान मिळाल्याने कार्यक्रमाला एक वेगळीच उंची प्राप्त झाली.

'जिव्हाळ्याची भिंत': जिथे माणुसकीची ऊब मिळते!




सुरज हेमके यांचे कार्य केवळ अन्नदान इतके मर्यादित नाही, तर ते भुकेल्या व्यक्तीला सन्मानाने आणि जिव्हाळ्याने जेवण पुरवण्याचे काम करतात. 'जिव्हाळ्याची भिंत' या संकल्पनेतून गरजू लोक त्यांच्या आवश्यकतेनुसार अन्न घेऊ शकतात.'अन्नदान छत्र' या माध्यमातून गरीब, बेघर आणि गरजूंपर्यंत ते दररोज स्नेहभोजनाची सेवा पोहोचवत आहेत. हेमके यांनी समाजातील सर्वात वंचित घटकांना मदत करण्याचे व्रत घेतले असून, त्यांची ही सेवा यवतमाळकरांसाठी प्रेरणास्रोत ठरत आहे.

**सन्मानामागील 'आधारस्तंभ'**

हा सत्कार सोहळा यशस्वी करण्यामागे विजयजी बुंदेला आणि आपले बंधू डॉ. दीपकजी घरजोडे सर यांचे मोलाचे योगदान आहे. त्यांच्या सहकार्यामुळेच सुरज हेमके यांच्या कार्याची दखल घेऊन यवतमाळच्या व्यासपीठावर त्यांना यथोचित मान मिळाला.

"ज्या मातीत सेवेचा आदर जपला जातो, त्या मातीतील प्रत्येक कणाने या कार्यात हातभार लावावा," अशी भावना आमदार बाळासाहेबजी मांगूळकर यांनी यावेळी व्यक्त केली.

सुरज हेमके यांच्या या प्रेरणादायी कार्यामुळे, भारतीय स्वयंसेवी महासंघाचा हा स्नेह मिलन कार्यक्रम खऱ्या अर्थाने 'माणुसकीच्या उत्सवात' रूपांतरित झाला!

सुरज हेमके यांनी 'जिव्हाळ्याची भिंत' आणि 'अन्नदान छत्र' माध्यमातून केलेल्या निस्वार्थ समाजकार्याबद्दल, भारतीय स्वयंसेवी महासंघाच्या स्नेह मिलन कार्यक्रमात आमदार बाळासाहेबजी मांगूळकर यांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला.

## खारघरमधील भूखंडाला सर्वाधिक बोली; सेंट्रल पार्कलगतचा प्लॉट तब्बल २१०० कोटींना

**दैनिक युवक आधार**
**नवी मुंबई**

नवी मुंबईतील भूखंडांचे भाव दिवसेंदिवस गगनाला भिडत असून 'सिडको'च्या लिलावांमध्ये विक्रमी दर नोंदवले जात आहेत. सानपाडा, नेरूळ, घणसोली, ऐरोली, बेलापूर, खारघर, पनवेल, कामोठे आणि उलवे परिसरात विकासकामे वेगाने होत असल्याने बांधकाम व्यावसायिकांचा कल या भागांकडे वाढला आहे. त्यातच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे क्षेत्राचे महत्त्व अधिकच वाढले असून खारघर हे रिअल इस्टेटचे नवे 'हॉट डेस्टिनेशन' ठरत आहे.

अलीकडेच झालेल्या सिडकोच्या लिलावात खारघर सेक्टर-२३ मधील सेंट्रल पार्क परिसरातील प्लॉट क्र. ८ (क्षेत्रफळ ४१,९९४ चौ.मी.) या प्रीमियम भूखंडाला तब्बल ५,०६,००१ रुपये प्रति चौ.मी. इतकी विक्रमी बोली मिळाली आहे. यामुळे या भूखंडाची




एकूण किंमत जवळपास २१२५ कोटी रुपयांपर्यंत पोहोचणार आहे. त्यामुळे खारघर हे नवी मुंबईतील सर्वाधिक मागणी असलेले प्रॉपर्टी डेस्टिनेशन म्हणून पुन्हा एकदा चर्चेत आले आहे.सिडकोच्या मार्केटिंग विभागाने खारघर सेक्टर-२३ मधील प्लॉट क्र. ८ विक्रीसाठी ऑनलाइन लिलाव प्रक्रिया राबवली होती. रेसिडेन्शियल आणि कमर्शिअल वापरासाठी असलेल्या या प्लॉटची आधारभूत किंमत ३,५१००१ रुपये प्रति चौ.मी. अशी होती. या प्लॉटला १.५ एफएसआय दिला जाणार आहे.

या लिलावात एकूण आठ बोलीदारांनी सहभाग घेतला होता आणि सर्वांनीच ३.६० लाख रुपयांपेक्षा जास्त दराच्या बोली लावल्या. त्यात आकार ॲस्ट्रोन कंपनीने सर्वाधिक ५,०६,००१ रुपयांची बोली लावत प्लॉट जिंकला. त्यानंतर नोबेल ऑर्गेनिव्हस प्रा. लि. (५,०५,००१ रुपये), लोढा डेव्हलपर्स (५,००,००१ रुपये) आणि फाल्कन लॅण्ड्स प्रा. लि. (४,१४,४१४ रुपये) या कंपन्यांची बोली लागल्या.शहरातील विविध नोड्ससाठी सिडकोने जाहीर केलेल्या लिलावांमध्ये बांधकाम व्यावसायिकांनी उच्च बोली लावल्यानंतर काही व्यावसायिक आणि वास्तुविशारदांनी या बोली अवास्तव असल्याची टीका केली आहे. यामुळे आगामी काळात घरांच्या किमती आणखी वाढण्याची शक्यता असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

**पूर्वीचाही विक्रम**

सिडकोने २५ सप्टेंबर २०२५ रोजी घेतलेल्या लिलावात खारघर सेक्टर-६ मधील प्लॉट क्र. १५ (क्षेत्रफळ ३००१.०३ चौ.मी.) हा भूखंड अभिनंदन बिल्डर्स यांनी ७.३५ लाख रुपये प्रति चौ.मी. या सर्वाधिक दराने जिंकला होता. त्यावेळी या प्लॉटची किंमत सुमारे २२० कोटी रुपये ठरली होती.

**सेंट्रल पार्कलगतचा प्रीमियम प्लॉट**

मेट्रो लाईन, गोल्फ कोर्स, इस्कॉन मंदिर आणि 'सेंट्रल पार्क'च्या सर्व्हिस रोडने वेढलेले हे ठिकाण खारघरमधील सर्वात प्रीमियम लोकेशन म्हणून ओळखले जाते. त्यामुळे येथे क्लब हाऊस, स्विमिंग पूल, जिमखाना, लँडस्केप गार्डन्स, वॉकिंग ट्रॅक आणि अत्याधुनिक सोयींसह निवासी व व्यावसायिक प्रकल्प उभारले जातील, असा अंदाज रिअल इस्टेट तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे.

**इतर भूखंडांनाही उच्च बोली**

सिडकोच्या ताज्या निकालांनुसार खारघर, घणसोली आणि कळंबोली येथील ८ भूखंडांच्या लिलावातही विक्रमी बोली लागल्या.

## गडचिरोलीत आरोग्य क्रांती : जागतिक दर्जाच्या आरोग्य सेवा उपलब्ध होणार – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक युवक आधार**

**गडचिरोली :** "गडचिरोलीचा चेहरा झपाट्याने बदलत असून औद्योगिकतेसोबत आता आरोग्य क्षेत्रातही क्रांती घडत आहे, व त्यातून जागतिक दर्जाच्या आरोग्य सेवा दक्षीण गडचिरोलीत उपलब्ध होणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केले.

मुख्यमंत्र्यांच्या हस्ते अहेरी येथे १०० खाटांच्या महिला व बाल रुग्णालयाचे लोकार्पण आणि सिरोंचा येथे रुबी हॉस्पिटल अँड वेलनेस प्रा. लि. च्या अत्याधुनिक ३५० खाटांच्या हॉस्पिटल आणि कॉलेज कॅम्पस प्रकल्पाचे भूमिपूजन आज संपन्न झाले. यावेळी राज्याचे वित्त व नियोजन, कृषी, मदत व पुनर्वसन, विधि व न्याय, कामगार राज्यमंत्री तथा जिल्ह्याचे सहपालकमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बीदरी, नक्षलविरोधी अभियानाचे विशेष पोलिस महानिरीक्षक संदीप पाटील, जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा, आमदार धर्मरावबाबा आत्राम, आमदार डॉ मिलिंद नरोटे, जिल्हा पोलिस अधीक्षक श्री निलोत्पल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास गाडे, सहाय्यक जिल्हाधिकारी कुशल जैन, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ माधुरी किलनाके, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ प्रताप शिंदे प्रामुख्याने उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले की, गडचिरोली जिल्ह्याचा आजचा दिवस 'आरोग्य क्रांती दिवस' म्हणून नोंदविला जाईल, कारण येथे औद्योगिक विकासाबरोबर आरोग्य सेवेतही क्रांतिकारक बदल घडत आहेत. अहेरी येथील १०० खाटांचे महिला व बाल रुग्णालय हे खाजगी रुग्णालयांनाही लाजवेल इतके अत्याधुनिक बनले असून, येथे मातृत्व, बाल आरोग्य आणि कुपोषणग्रस्त बालकांसाठी सर्व आधुनिक सुविधा उपलब्ध आहेत. यासोबतच भामरागड तालुक्यातील कोटी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची मुख्य इमारत, जरावंडी व ताडगाव प्राथमिक आरोग्य केंद्रांचे श्रेणीवर्धन, वेंगनुर उपकेंद्र आणि रेगडी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतींचेही लोकार्पण करण्यात आले. तसेच, चामोर्शी, मुलचेरा, एटापल्ली, भामरागड, धानोरा, कुरखेडा, कोरची व सिरोंचा या तालुक्यांतील नव्या सार्वजनिक आरोग्य पथकांचे उद्घाटनही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले.

त्याचप्रमाणे, सिरोंचा तालुक्यातील राजेश्वरपल्ली येथे रुबी हॉस्पिटल अँड वेलनेस प्रा. लि. च्या प्रकल्पाचा भूमिपूजन सोहळा पार पडला. मुख्यमंत्री म्हणाले की, रुबी हॉस्पिटल हे जागतिक स्तरावरील रूग्णांची सेवा देण्यासाठी ओळखले जाते आणि आता त्याच दर्जाची सुविधा गडचिरोलीत उपलब्ध होणार आहे. यामुळे गडचिरोलीतील रुग्णांना उपचारासाठी नागपूर, पुणे किंवा मुंबई गाठण्याची गरज उरणार नाही. विशेष म्हणजे, महाराष्ट्र, तेलंगणा आणि छत्तीसगड या तीन






राज्यांतील रुग्णांना या अत्याधुनिक सेवेचा लाभ घेता येणार आहे. या रुग्णालयात महात्मा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत आता वाढवून २४०० आजारांवर मोफत उपचार मिळणार आहेत. हॉस्पिटलसोबतच येथे वैद्यकीय व नर्सिंग कॉलेज आणि शाळाही सुरू होणार असल्याने स्थानिक युवक-युवतींना प्रशिक्षण आणि रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होतील, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

गडचिरोलीच्या सर्वांगीण विकासावर बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, लोह प्रकल्पांमुळे गडचिरोली जिल्हा 'देशातील स्टील हब' बनत आहे, पण या औद्योगिक विकासासोबतच गडचिरोलीला 'ग्रीन हब' बनवायचे आहे. त्यासाठी पाच कोटी झाडांच्या लागवडीचा निर्णय घेण्यात आला आहे. दळणवळण सुधारण्यासाठी ५०० कोटी रुपयांचे रस्ते मंजूर करण्यात आले असून, पूल व नाले बांधकामाची कामेही वेगाने सुरू आहेत.

याप्रसंगी महिलांसाठी राखीव 3 टक्के निधी मधून रु. ३ कोटी फिरता निधी प्रति गट रु. १ लाख प्रमाणे मंजूर करण्यात

आलेले आहे. सदर फिरता निधी वितरण शुभारंभ मुख्यमंत्री यांचे हस्ते अहेरी तालुक्यातील बिरसामुंडा महिला बचत गट, राजाराम गटाला देऊन करण्यात आला.

**गडचिरोलीच्या विकासासाठी उद्योग–आरोग्य–महिला सक्षमीकरणाचे त्रीसुत्र – सहपालकमंत्री जयस्वाल**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली गडचिरोली जिल्ह्यात विकासाची गती वाढली असून, मागील अर्थसंकल्पात केवळ गडचिरोलीलाच ५०० कोटी रुपयांचा निधी मिळाल्याचे सहपालकमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांनी सांगितले.

ते म्हणाले, "जिल्ह्याचा समावेश राज्यातील पहिल्या दहा प्रगत जिल्ह्यांत व्हावा, यासाठी उद्योग, आरोग्य आणि महिला सक्षमीकरण या त्रीसुत्रीवर आधारित विकासाचा आराखडा राबविण्यात येत आहे."

महिला सक्षमीकरणासाठी जिल्हा नियोजन समितीच्या महिलांसाठी राखीव निधीतून तीन कोटी रुपयांचा फिरता निधी मंजूर करण्यात आला असून प्रत्येक बचत गटाला एक लाख रुपये दिले जातील. गडचिरोलीत यशस्वी ठरलेले हे मॉडेल आता संपूर्ण राज्यात राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी आमदार धर्मरावबाबा आत्राम यांनी मनोगत व्यक्त करताना अहेरी क्षेत्राच्या विकासासाठी मुख्यमंत्री यांच्याकडे विविध मागण्या मांडल्या. जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाचे माहिती दिली.

यांप्रसंगी विविध लोकप्रतिनिधी, अधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बाळदी येथील तलाठी कार्यालय गवताच्या विळख्यात

## तलाठी कार्यालयाकडे अधिकाऱ्याचे दुर्लक्ष

**दैनिक युवक आधार**
**उमरखेड तालुका प्रतिनिधी**
**राजु गायकवाड**

उमरखेड तालुक्यातील बाळदी येथील तलाठी कार्यालय बंद अवस्थेत पडले आहे.शासनाने लाखो रुपयांचा निधी खर्च करून हे कार्यालय उभे केले आहे. काही गावांमध्ये तलाठी अधिकाऱ्यांना स्वमालकीचे कार्यालय सुद्धा उपलब्ध नाही त्यामुळे त्यांना गावचा कारभार तालुक्याच्या शासकीय कार्यालयातून हाताळावा लागतो परंतु इथे तलाठी कार्यालय उपलब्ध असून ते अधिकारी गावात का येत नाही अशी चर्चा गावात जोरदार सुरू असून याकडे वरिष्ठ अधिकाऱ्याने लक्ष देऊन योग्य ती कारवाई करावी. अशी चर्चा तेथील गावकऱ्याकडून ऐकायला मिळत आहे.त्या कार्यालयावर वेलाचा डोंगर कोसळला तसेच समोरच्या बाजूने उंच गवताचा बाजार भरला आहे तरी याकडे प्रशासन जाणून बुजून दुर्लक्ष करत आहे.

महसूल विभाग हा शासनाचा कणा मानला जातो व महसूल विभागाच्या कामकाजात प्रमुख दुवा असलेला तलाठी अवघ्या गावाचा कारभार पाहतो गावातील प्रत्येक मिळकतीच्या माहितीपासून ते सातबारावरील नोंदी, विविध दाखले वितरण




करणे, शासनाच्या योजना गावातील घटकापर्यंत पोहोचण्याचे काम तलाठी करत असतात.परंतु बाळदी येथील तलाठी मुख्यालतयी हजर न राहता तालुक्याच्या ठिकाणाहून गावचा सर्व कारभार चालवतो. त्यामुळे गावातील लोकांना खूप मोठ्या प्रमाणात ये जा चे हेलफाटे मारावे लागते.अगोदरच पावसाने शेतकऱ्याचे प्रचंड प्रमाणात नुकसान केले.त्यामुळे शेतकरी पहिलेच आपल्या चिंतेत पडलेला आहे. या सर्व बाबी लक्षात घेऊन संबंधित अधिकाऱ्यावर योग्य ती कारवाई वरिष्ठ अधिकारी करतील का? असा प्रश्न त्या गावातील लोकांमध्ये जोर धरत आहे.

# गोई नदीचं मोहक रूप ड्रोनच्या नजरेतून – गोळेगाव परिसरातील निसर्गाचं अप्रतिम सौंदर्य नजरेत साठवलं!

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**

**विंचूर** :-निफाड तालुक्यातील गोळेगाव येथे वाहणारी गोई नदी ही केवळ जलस्रोत नसून निसर्गाने दिलेला एक जिवंत काव्यसंग्रह आहे. हिरवाईने नटलेले डोंगर, नदीच्या वळणांवरून वाहणारे पारदर्शक पाणी, आणि किनाऱ्यावर उभ्या असलेल्या झाडांची सावली — या सगळ्यांनी मिळून तयार केलेला दृश्यानुभव म्हणजे एक अप्रतिम निसर्गचित्रच म्हणावे लागेल.

असे हे मंत्रमुग्ध करणारे दृश्य ड्रोन् कॅमेऱ्याद्वारे छायाचित्रकार पंडित मुदगुल यांनी टिपले* असून, त्यांच्या कॅमेऱ्यातून उलगडलेला हा निसर्गरंग आता सोशल मीडियावर चांगलाच गाजत आहे. ड्रोन् फुटेजमध्ये गोई नदीच्या काठावरून वळण



"शांत निर्झराच्या साक्षीने, निसर्गरंगांना कवेत घेऊन, गोई नदीच्या पाण्यात, हलकेच डोंगर उतरतीन

घेत वाहणारा प्रवाह, डोंगरांच्या कुशीतून झेपावणारी झुळूक, आणि सभोवतालचा हिरवा गालिचा — हे सगळं पाहणाऱ्याला क्षणभर थांबून निसर्गात हरवायला भाग पाडतं.

पावसाळ्यानंतर नदीचा प्रवाह वाढतो, परिसरातील झाडं नव्या पालवीने नटतात आणि सकाळच्या धुक्यातून उमटणारा सूर्यकिरण नदीच्या पाण्यात सोनसळी झळाळी निर्माण करतो. त्यामुळे या काळात गोई नदीकाठचा परिसर पर्यटनप्रेमी, छायाचित्रकार आणि निसर्गरम्य ठिकाण शोधणाऱ्यांसाठी एक आकर्षण बनतो आहे.

स्थानिक ग्रामस्थ सांगतात की, "या नदीचं पाणी वर्षभर स्वच्छ आणि थंड राहतं. गोई नदीकाठावर सकाळच्या किंवा सायंकाळच्या वेळी फिरायला गेलं की मन प्रसन्न होतं. आता ड्रोनद्वारे या ठिकाणाचं सौंदर्य सगळ्यांना पाहायला मिळतंय, ही आनंदाची बाब आहे."

पंडित मुदगुल यांनी सांगितलं की, "निसर्ग आपल्या आजूबाजूला रोज नवनवीन रूप दाखवतो. ड्रोनच्या माध्यमातून त्याचं सौंदर्य एका वेगळ्या दृष्टीकोनातून पाहता आणि दाखवता येतं. गोई नदीचा परिसर म्हणजे निसर्गप्रेमींसाठी एक अविस्मरणीय ठेवा आहे."

ड्रोन् फुटेज पाहिल्यानंतर सोशल मीडियावरून अनेकांनी प्रतिक्रिया दिल्या आहेत. काहींनी या ठिकाणाला 'निफाडचा मिनी कोंकण' अशी उपमा दिली असून, काहींनी इथं पर्यटनस्थळ म्हणून विकास व्हावा अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

डोंगर, हिरवाई आणि नदीच्या सान्निध्यात नटलेला गोई नदीचा परिसर हा केवळ एक भौगोलिक स्थान नसून, निसर्गाशी एकरूप होण्याचं ठिकाण आहे. पंडित मुदगुल यांच्या कॅमेऱ्याने टिपलेली ही दृश्यं म्हणजे निसर्गाच्या कवेत हरवण्याचं आमंत्रणच जणू...

# मालेगाव नगरपंचायत निवडणुकीत इच्छुकांची झुंबड!; तिकीटासाठी धावपळ, गटबाजीला उधाण..

**दैनिक युवक आधार**
**मालेगाव तालुका प्रतिनिधी..प्रकाश भुरे**

मालेगाव नगरपंचायत निवडणुकीचा बिगुल वाजताच मालेगाव शहरात राजकीय हलकल्लोळ माजला आहे नगरसेवकपदाच्या तिकीटासाठी इच्छुकांची अक्षरश झुंबड उडाली आहे प्रत्येक प्रभागातून अनेक दावेदार पुढे सरसावत असून कोणाला तिकीट मिळणार या प्रश्नावर सर्वत्र तर्कवितर्क सुरू आहेत

पक्षांच्या कार्यालयांत दिवसभर गर्दी शिफारशीचे फोन मोठ्या नेत्यांकडे धावपळ असे दृश्य सर्वत्र दिसून येत आहे काही इच्छुकांनी तर आपली ताकद दाखवण्यासाठी



जनसंपर्क मोहिमा पोस्टरबाजी सोशल मीडियावर प्रचार सुरू केला आहे तर काहींनी मोठ्या नेत्यांच्या घरापुढे उभे राहून पाठबळ मिळवण्याचे राजकीय प्रयोग सुरू केले आहेत तिकीट वाटपावरून काही ठिकाणी गटबाजी आणि अंतर्गत भांडणेही उफाळून आली आहेत आम्ही पहिल्यापासून काम केले मग नव्याने आलेल्यांना तिकीट का? असा प्रश्न अनेक जुन्या कार्यकर्त्यांकडून उपस्थित केला जात आहे


दरम्यान नागरिकांमध्येही चर्चाचा विषय म्हणजे "यंदा मत कामावर मिळेल की पैशावर? काही मतदार म्हणतात यावेळेस विकासच हवे दिखावा नाही(एकूणच मालेगाव नगरपंचायत निवडणूक म्हणजे इच्छुकांची गर्दी गटबाजीचा गडगडाट आणि सत्तेच्या आसनासाठी सुरू झालेली धडपड राजकीय तापमान चरमसीमेवर असून पुढील काही दिवसांत कोणाची झोळी उमेदवारीने भरते आणि कोणाची स्वप्नं फुटतात हे पाहणं तितकंच रोमांचक ठरणार आहे)

# जेएनपीए ई-स्पीड बोटीच्या ट्रायल रनला हिरवा कंदील

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी**

जेनपीए बंदर ते मुंबईतील गेट वे ऑफ इंडिया दरम्यान सुरू असलेला जलप्रवास आता जलद होणार आहे. सध्याचा तासाभराचा असलेला प्रवास अवघा ३५ ते ४० मिनिटात वातानुकूलित बोट मधून करता येणार आहे. त्यामुळे उरणकरांना आरामाची प्रवास सुविधा उपलब्ध होणार आहे.

लाकडी प्रवासी बोटीला निरोप देण्याचा निर्णय आता जेएनपीए संचालक मंडळाने घेतला आहे. जेएनपिए बंदरातून मुंबईत प्रवाशांना घेऊन जाण्या येण्यासाठी अद्यावत स्पीड बोटी धावणार आहेत. जेएनपीएची मुंबईशी जोडणारी मागील १० महिन्यापासून मुहूर्ताच्या गर्तेत अडकलेली ई-स्पीड बोट सेवेच्या ट्रायल रन ला गुरूवार दिनांक ६ नोव्हेंबर रोजी सुरुवात झाली



आहे..

या प्रदूषण विरहित स्पीड बोटीमुळे ३५ मिनिटात प्रवाशांना जेएनपीए ते मुंबईत पोहोचण्यात येणार आहे. १० वर्ष ई-स्पीड बोटीची सेवा पुरवण्यासाठी जेएनपीए ने ३७ कोटी ८९ लाख ९४हजार १९० रुपये खर्चाची तरतूद केली आहे .माझगाव डॉक बिल्डर्स लिमिटेड कंपनीने गुरुवारपासून ई-स्पीड सेवेच्या ट्रायल रनला सुरुवात केल्याची माहिती कंपनीचे एच आर नीरज यांनी दिली. प्रवासी वाहतुकीसाठी आवश्यक सुरक्षितता, स्पीड ,बॅटरी चार्जिंग आणि स्पीड बोटीच्या कामगिरी बाबत समाधान केले जात नाही, तोपर्यंत ई -स्पीड बोट प्रवासी वाहतुकीला परवानगी दिली जाणार नसल्याचेही पवार यांनी स्पष्ट केले आहे दरम्यान ही सेवा मुंबईतून ये जा करणाऱ्या जेएनपीए कामगार ,प्रकल्पग्रस्त, कस्टम, एअरफोर्स, सीआयएसएफ आधी कामगारांसाठी उपयुक्त ठरणार आहे.

# शिक्षणासाठी संवेदनशीलता दाखवत माजी सैनिक दांपत्याचे प्रेरणादायी पाऊल

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

**विंचूर :** विष्णूनगर येथे सामाजिक बांधिलकी जोपासत आणि शिक्षण क्षेत्रासाठी संवेदनशीलता दाखवत वै. ह. भ. प. नामदेव महाराज शेळके यांच्या स्मरणार्थ त्यांच्या लेकजावई सौ. पुष्पलताई व श्री. संजीव पाटील (माजी सैनिक), विंचूर यांनी जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा, विष्णुनगर या शाळेसाठी वॉटर डिस्पेन्सर (थंड व गरम पाण्याचे मशीन) भेट देऊन दातृत्वाचा एक सुंदर आदर्श निर्माण केला आहे.उन्हाळ्यात विद्यार्थ्यांना थंड पाणी आणि हिवाळ्यात गरम पाणी सहज उपलब्ध व्हावे, या हेतूने देण्यात आलेली ही भेट विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. ग्रामीण भागातील शाळांमध्ये अशा सुविधा दुर्मिळ असताना, या कार्याचे शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षकवर्ग, पालक व ग्रामस्थांनी मनापासून कौतुक केले."शिक्षणासाठी दिलेला हा मदतीचा हात केवळ सुविधा पुरवणारा नसून, समाजातील इतर नागरिकांना प्रेरणा देणारा ठरला आहे," अशी भावना शाळेच्या शिक्षकांनी व्यक्त केली.या



प्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, शिक्षकवर्ग तसेच सूर्यभान घायाळ, हेमंत घायाळ, ज्ञानेश्वर शेळके, दीपक घायाळ, दीपक कोटकर, विश्वनाथ घायाळ यांसह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.सर्वांच्या वतीने सौ. पुष्पलताई व श्री. संजीव पाटील यांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले.

# श्रीवर्धन काहींची मालमत्ता नाही; श्रीवर्धनचा निर्णय जनता घेणार – मंत्री भरतशेठ गोगावले

## श्रीवर्धन तालुक्यात उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाला मोठा धक्का; कोळंबेकर दांपत्यांचा शिंदे गटात प्रवेश

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी -अनिकेत मोहित**

श्रीवर्धन तालुक्यात आज शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाला मोठा धक्का बसला आहे. रायगड जिल्हा परिषदेत महिला व बालकल्याण सभापतीपद भूषवलेल्या अक्षदा कोळंबेकर आणि माजी जिल्हा परिषद सदस्य तसेच माजी तालुकाप्रमुख अविनाश कोळंबेकर यांनी समर्थकांसह शिवसेना (शिंदे गटात) जाहीर प्रवेश केला. रानवली येथील पटांगणावर झालेला हा पक्षप्रवेश सोहळा उत्साहात पार पडला.

या वेळी मंत्री भरतशेठ गोगावले यांच्या उपस्थितीत शेकडो कार्यकर्त्यांनी उद्धव ठाकरे गटाचा राजीनामा देत शिंदे गटात प्रवेश केला. सोहळ्याला सहसंपर्कप्रमुख



चंद्रकांत कळंबे, जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, तालुकाप्रमुख सुरेश मिरगळ, सचिन पाटेकर, रवींद्र लाड, सुरेश महाडिक आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी भाषण करताना मंत्री भरतशेठ गोगावले म्हणाले,"हा पक्षप्रवेश श्रीवर्धन तालुक्याच्या राजकारणाला नवं वळण देणार आहे. आम्ही कधी खोटं बोललो नाही, चुकीचं केलं नाही. शेतकऱ्याचा मुलगा असल्याने आमचं मन मोठं आहे, गरीबांचा आशीर्वाद हेच आमचं बळ आहे."

महात्मा फुले आरोग्य योजनेबाबत ते म्हणाले, "या योजनेची मर्यादा पाच लाखांवरून आणखीन वाढवली जाणार आहे. तसेच रोजगार हमी योजनेंतर्गत २६४ नवे प्रकल्प सुरू करण्याची तयारी आहे."

बॉक्साईट संदर्भात त्यांनी स्पष्ट इशारा दिला की,"ते चांगल्या रीतीने वागले तर ठीक, नाहीतर त्यांचा जय हरी करायला वेळ लागणार नाही."

आगामी निवडणुकांवर भाष्य करताना गोगावले म्हणाले,"पहिला प्रस्ताव महायुतीचा आहे. ज्याची जशी ताकद तसं वाटप केलं जाईल. श्रीवर्धन काहींची वैयक्तिक मालमत्ता नाही, निर्णय जनता घेणार आहे. युती झाली तरी ठीक, नाही झाली तरी आम्ही सज्ज आहोत."

मंत्री गोगावले यांच्या सततच्या दौऱ्यांमुळे आणि कार्यकर्त्यांशी थेट संवादामुळे श्रीवर्धन तालुक्यात शिंदे गटात नवचैतन्य निर्माण झाले असून, आगामी निवडणुकांसाठी नव्या राजकीय समीकरणांची चाहूल लागली आहे.

# देवगाव गटात धर्मराज (पंकज) श्रीहरी घोटेकर यांना प्रचंड प्रतिसाद!

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

**खेडलेझुंगे** :आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुकांची रणधुमाळी सुरू होताच नांदूर देवगाव गटात एक नाव सगळीकडे चर्चेत आहे — धर्मराज (पंकज) श्रीहरी घोटेकर!

गावोगाव त्यांच्या भेटीगाठींना उस्फूर्त गर्दी, तरुणांचा उत्साह, महिलांचा विश्वास आणि ज्येष्ठांचा आशीर्वाद दिसून येतोय. लोकांमध्ये भावनिक ओढ निर्माण करणारा संवाद आणि वर्षानुवर्षं केलेली जनसेवा यामुळे मतदारवर्गात त्यांच्याविषयीचा विश्वास अधिक दृढ झाला आहे.

घोटेकर यांनी सामाजिक आणि विकासकामांमध्ये सातत्याने सक्रिय भूमिका बजावली आहे. विशेष म्हणजे — रस्त्यांच्या दुरवस्थेवर त्यांनी आमरण उपोषण करून



प्रशासनाला झोपेतून उठवलं!

त्यांच्या या लढवय्या वृत्तीमुळे लोकांमध्ये

> **"आमचं दु:ख त्याने जाणलं, आमच्यासाठी तो उपोषणावर बसला — म्हणून आम्हीही त्याच्यासोबत ठाम आहोत."**
> **— ग्रामस्थ, देवगाव गट**

एकच चर्चा सुरू आहे "अशा माणसालाच संधी मिळायला हवी!"

"घोटेकर म्हणजे संघर्ष, विश्वास आणि आपलेपणाचं प्रतीक आहे."तरुण वर्ग सोशल मीडियावर "स्थानिक उमेदवाराला संधी द्या" अशी मोहीम राबवत आहे. गावागावातून येणाऱ्या लोकांचा एकच सूर "बाहेरच्यांवर नाही, आता आपल्या माणसावर विश्वास ठेवूया."आज धर्मराज (पंकज) श्रीहरी घोटेकर हे केवळ एक उमेदवार नसून, जनतेच्या भावना आणि विकासाच्या नव्या आशा बनले आहेत.

# आदिजनता माध्य.व उच्च माध्यमिक विद्यालयात माजी विद्यार्थी स्नेहमेळावा मोठ्या उत्साहात

**दैनिक युवक आधार**
**राजेंद्र टोपले , सुरगाणा**

सुरगाणा तालुक्यातील आदिजनता माध्य .व उच्च माध्यमिक विद्यालय आमदा ( प.) येथे प्राचार्य श्री. खैरनार सर यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतून शिक्षण घेऊन विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करीत असलेल्या सर्वच माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा पार पडला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी श्री. खैरनार सर हे होते. या मेळाव्यात माजी विद्यार्थी संघ स्थापन करण्यात आला .

यामध्ये संघ अध्यक्ष श्री. सुभाष कामडी, उपाध्यक्ष श्री. गुलाब म्हसे, कोषाध्यक्ष श्री. कांतीलाल भुसारे, सदस्य श्री. हिरामण गायकवाड, राजेश पेटार, राजेंद्र टोपले यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

यावेळी शिक्षण हे किती महत्वाचे आहे ,तसेच खेडोपाड्यात असलेल्या



विद्यालयांची गुणवत्ता कशी वाढवता येईल यावर मनोगत व्यक्त केले. विद्यालयात शिक्षण घेतल्यानंतर आज विविध क्षेत्रात नोकरी करतो.

आमचा विकास येथूनच झाला म्हणून या शाळांना विसरून चालणार नाही, तर या शाळा टिकाव्यात म्हणून आमचेदेखील या शाळेसाठी देणे लागते तेव्हा आम्ही या शाळेला हवी तेव्हा मदत करू असे आश्वासन माजी विद्यार्थ्यांनी दिले.

या मेळाव्यात माजी विद्यार्थ्यांनी स्नेहसंवाद व आपल्या जीवनात आलेले अनुभव सांगत जुन्या आठवणींना उजाळा दिला. यातूनच आपल्याला शिक्षकाविषयी असलेला आदर आपणांस दिसून आला.

या कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन श्री. मोरे सर यांनी केले. कार्यक्रमाप्रसंगी प्राचार्य श्री. खैरनार सर , श्री. मोरे सर, श्री मांडगे सर , श्री. जाधव सर, श्री. भामरे सर , श्री. चौधरी, भोये दादा यांच्यासह माजी विद्यार्थी, कर्मचारी उपस्थित होते.

**दैनिक युवक आधार** हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# फिटनेसच्या नावाखाली नशेचा धंदा! आक्षी गावचा सुरज राणे पोलिसांच्या जाळ्यात

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

सुरज मनोज राणे तरुणांना देत होता नशा निर्माण करणारी इंजेक्शन्स. विनापरवाना औषधी इंजेक्शन विक्री प्रकरणी अलिबाग पोलिसांची पहाटेची धडाकेबाज कारवाई; ₹४,८५६ किंमतीचा मुद्देमाल जप्त.फिटनेस आणि जिमच्या नावाखाली वाढत चाललेल्या नशेच्या प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी अलिबाग पोलिसांनी केलेल्या धाडसी कारवाईत आक्षी गावातील एका युवकाला विनापरवाना नशाकारक औषधे विक्री करताना रंगेहात पकडले आहे.या कारवाईत पोलिसांनी सुमारे ₹४,८५६ किंमतीचा मुद्देमाल जप्त केला असून, आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १२५ व २७८ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




तसेच ड्रग्ज अ‍ॅण्ड कॉस्मेटिक अ‍ॅक्ट १९४० अंतर्गत स्वतंत्र गुन्हाही दाखल झाला आहे.ही कारवाई ७ नोव्हेंबर २०२५ रोजी पहाटे ३.१९ वाजता अलिबाग शहरात करण्यात आली.ही संपूर्ण मोहीम रायगड जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली, अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे, उपविभागीय पोलीस अधिकारी माया मोरे यांच्या देखरेखीखाली पार पडली.अंमलदार पथकात पोलीस निरीक्षक किशोर साळे, उपनिरीक्षक दीपक मोरे, बळीराम केंद्रे, पोलीस हवालदार विलास आंबेतकर, परेश म्हात्रे, महिला पोलीस शिपाई कोमल मिलींद धाईजे आणि सायली सतिश थिटे यांनी सहभाग घेतला. आरोपी आणि पार्श्वभूमी अटक आरोपीचे नाव सुरज मनोज राणे (वय २६, व्यवसाय–वेल्डिंग, रा. आक्षी साखर, ता. अलिबाग) असे आहे.त्याच्यावर पूर्वीही अलिबाग पोलीस ठाण्यात गु. र. नं. ६२/२०२५ अंतर्गत विविध कलमांखाली गुन्हा नोंद आहे.जप्त मुद्देमाल पोलिसांनी आरोपीकडून पुढीलप्रमाणे नशाकारक औषधी आणि रोकड जप्त केली.Mepentermin Sulphate Injection IP 30mg या औषधाच्या १०ml क्षमतेच्या १० बाटल्या (५ पूर्ण, २ अर्धवट, ३ रिकाम्या) किंमत ₹४,५६८लाल टोप असलेली पांढऱ्या रंगाची ४ इंजेक्शन्स रोख ₹३,०००, ज्यात डमी ग्राहकाकडून दिलेल्या नोटांचा समावेश एकूण मुद्देमालाची किंमत ₹४,८५६ इतकी आहे.रंगेहात पकड गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी डमी ग्राहक पाठवून सापळा रचला.आरोपी सुरज मनोज राणे आपल्या वेल्डिंग वर्कशॉपमधून ही इंजेक्शन्स जिमला जाणाऱ्या आणि साहसी खेळ खेळणाऱ्या तरुणांना विक्री करत होता. पोलिसांनी त्याला रंगेहात अटककेली. Mepentermin Sulphate Injection IP 30mg चा वापर कृत्रिम ऊर्जा व स्नायू वाढवण्यासाठी केला जातो, परंतु हे औषध आरोग्यास अत्यंत घातक आहे. याच्या सेवनाने हार्टअटॅक, बीपी वाढणे, किडनी निकामी होणे यांसारखे गंभीर आजार उद्भवतात. तपासातील धक्कादायक माहिती तपासादरम्यान असे उघड झाले की, या वर्कशॉपमध्ये १८ वर्षांखालील अल्पवयीन तसेच ३५ वर्षांपर्यंतचे तरुण ही औषधे खरेदीसाठी येत असत.फिटनेस, मसल्स वाढवणे आणि स्टॅमिना सुधारण्याच्या नावाखाली या नशाकारक औषधांचा वापर वाढत असल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे.प्रशासन आणि पोलिसांचे आवाहन या प्रकरणी अन्न व औषध प्रशासन विभागानेही हस्तक्षेप करून आरोपीवर ड्रग्ज अ‍ॅण्ड कॉस्मेटिक अ‍ॅक्ट १९४० च्या कलम १८(सी) व २७(बी) नुसार स्वतंत्र गुन्हा दाखल केला आहे. अलिबाग पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की “जिम अथवा खेळासाठी कोणत्याही प्रकारचे नशाकारक औषध किंवा इंजेक्शन वापरू नये.ही औषधे आरोग्यास घातक असून, त्यांचा परिणाम शरीरावर विनाशकारी ठरतो.अशा औषधांची विक्री कोठे होत असल्यास तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात माहिती द्यावी.”पालकांसाठी विशेष सूचना पालकांनी आपल्या मुलांच्या मनगटाजवळील नसा, टोचल्याच्या खुणा किंवा काळे डाग याकडे लक्ष द्यावे.अशी लक्षणे दिसल्यास वैद्यकीय सल्ला घेऊन पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.सामाजिक प्रतिक्रिया या कारवाईनंतर आक्षी गावासह अलिबाग परिसरात नशाकारक औषधी विक्रीचे जाळे उघडकीस आले आहे.फिटनेसच्या नावाखाली वाढत चाललेल्या नशेच्या सवयींना आळा बसावा, यासाठी पोलिसांचे पाऊल कौतुकास्पद आणि सामाजिक दृष्ट्या महत्त्वाचे असल्याचे स्थानिक नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी मत व्यक्त केले आहे.

## युवकांचे अनोखे आंदोलन; हार-नारळ फोडून प्रशासनाला जागे करण्याचा प्रयत्न

**दैनिक युवक आधार**
**लातूर/ मोहम्मद पिंजारी**



मुरुड शहरातील छल्लाणी दवाखान्याशेजारील मुख्य रस्त्यावर असलेला पूल मागील चार ते पाच वर्षांपासून तुटलेलाच अवस्थेत पडून आहे. आठवडी भुसार बाजारात जाण्यासाठी हा मार्ग अत्यंत महत्त्वाचा असून विद्यार्थ्यांचीही मोठी वर्दळ या रस्त्यावर असते. परंतु नागरिकांची ही रोजची गैरसोय दुर्लक्षितच राहिल्याने शहरातील लोकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. याच मार्गावर काही नागरिक संयम सुटून कचरा टाकू लागल्याने परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरली असून त्याचा त्रास येथील व्यापारी व रहिवाशांना सहन करावा लागत आहे. “कचरा, खड्डे आणि तुटलेला पूल... आमचं रोजचं जगणंच अवघड केलंय,” अशी भावना स्थानिकांनी व्यक्त केली

या पूलावरील दुरुस्तीचे काम अद्यापही सुरू न झाल्याने नागरिकांच्या रोषाला अखेर उधाण आले. मुरुडमधील काही युवकांनी तुटलेल्या पुलावर प्रतिकात्मक हार अर्पण करून आणि नारळ फोडून अनोख्या पद्धतीने आंदोलन केले.

"पूल तुटून वर्षानुवर्षे झाले, पण कामाचा एकही दगड हलला नाही; आमच्या प्रश्नांकडे लक्ष देणारे कुठे आहेत?" असा सवाल युवकांनी यावेळी उपस्थित केला. या आंदोलनामुळे परिसरात काही काळ मोठी चर्चा रंगली. तसेच, “पूल दुरुस्तीचं काम करून देण्यासाठीनंच हा आवाज आहे, आमच्या सहनशक्तीला आता मर्यादा आलीये,” असे युवकांनी सांगितले.

आंदोलनकर्त्यांनी प्रशासनाने जागेवर भेट देऊन परिस्थितीचा थेट आढावा घ्यावा, अशी ठाम मागणी केली.


तुटलेल्या पुलामुळे रस्त्यावर खड्डे, अडथळे व अंधारामुळे छोटे-मोठे अपघात सातत्याने होत आहेत. एखाद्याचा जीव गेल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का? असा थेट आरोप स्थानिकांनी केला आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न, रोजच्या वाहतुकीची झळ, तसेच बाजारपेठेतील व्यापारावर होणारा परिणाम—या सर्व गंभीर मुद्द्यांबरोबरच कचऱ्यामुळे वाढणारा दुर्गंध, घाणीचा त्रास आणि रोगराईचा धोका याकडेही लक्ष वेधले जात आहे. “एवढे वर्षे जनता त्रस्त आहे, पण प्रशासनाच्या कानावर अजूनही पोंग्याचा आवाज जात नाही,” अशी भावना व्यापाऱ्यांनीही व्यक्त केली. स्थानिक प्रशासनाने तातडीने पूल दुरुस्तीचे काम सुरू करून नागरिकांची वाढती गैरसोय दूर करावी, अशी जोरदार मागणी नागरिक व व्यापारी वर्गाकडून करण्यात येत आहे यावेळी सुशील कुमार सवासे, मोसिन मनियार,बाबा सावासे, प्रविण बुबने, विजयानंद गायकवाड, इं. शिवलिंग चौधरी, सुरज ,शरीफ सय्यद, पिंपरे , तसेच स्थानिक व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सार्वजनिक ठिकाणांवरून भटक्या कुत्र्यांना हटवण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे आदेश

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी**

सार्वजनिक ठिकाणांवरील भटक्या कुत्र्यांवर सर्वोच्च न्यायालयाचा मोठा निर्णय!आता शाळा, रुग्णालये, बसस्थानके, रेल्वे स्टेशन आणि प्रार्थनास्थळांवरून हे कुत्रे हटवण्याचे आदेश सुप्रीम कोर्टाने सर्व राज्यांना शुक्रवार दिनांक ७ नोव्हेंबर रोजी दिले आहेत.

**न्यायालयाचा आदेश स्पष्ट:**



या कुत्र्यांची नसबंदी आणि लसीकरण झाल्यानंतर त्यांना पुन्हा त्याच ठिकाणी सोडले जाणार नाही.नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देत, या कामासाठी नोडल अधिकारी नियुक्त करण्याचेही निर्देश दिले आहेत. नागरिकांकडून या निर्णयाचे स्वागत होत आहे.

## वंदे मातरम् हे गीत भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे प्रेरणास्थान आहे - लक्ष्मीकांत तिडके

**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी अशोक नवघरे**

**पाथरी :-** भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद झालेला वंदे मातरम् हा एकतेचा मंत्र असून हे गीत भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे प्रेरणास्थान आहे यातील देशप्रेम शौर्य एकतेचा आत्मा आपल्या कृतीतून जिवंत ठेवणे हीच खरी देशसेवा आहे आपला देश पारतंत्र्यातून मुक्त व्हावा नागरिकांनी आपसातील मतभेद विसरून एकत्र यावे देशाला समृद्ध करावे असे बंकिमचंद्र चटोपाध्याय यांचें चिंतन होते इ.स१८७५ मध्ये बंकीमचंद्र चटोपाध्याय यांनी त्यांच्या आनंद मठ कादंबरी मध्ये वंदे मातरम् हे गीत लिहिले आहे ते प्रथम १८९६ मध्ये कलकत्ता अधिवेशनात सर्वप्रथम सरलादेवी चौधराणी यांनी गायले होते १८७५ मध्ये लिहिलेल्या या गीतास ७ नोव्हेंबर रोजी १५० वर्ष पूर्ण झाले आहे हे गीत स्वातंत्र्य चळवळीमध्ये शौर्याचे प्रतिक बनलेले होते या गीताने समाजामध्ये देशप्रेम जागृत निर्माण केले या गीतापासून प्रेरणा घेऊन अनेक क्रांतिकारक घडले स्वातंत्र्य चळवळीतील त्यांचा सहभाग व बलीदानातून देशाला स्वातंत्र्य मिळाले या गीतातून प्रेरणा घेऊन प्रत्येकाने देशभक्तीची ज्योत प्रज्वलित ठेवावी असे दि ७ नोव्हेंबर शुक्रवार रोजी मुदगल येथील सरपंच लक्ष्मीकांत तिडके यांनी ग्रामपंचायत कार्यालयांमध्ये वंदे मातरम् गीताचा सामूहिक गायन कार्यक्रम आयोजित केला होता यावेळी ग्रामपंचायत सदस्य शालेय विद्यार्थी पालक शिक्षक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते

## वार्ड क्रमांक 3 मध्ये भाजपचे इच्छुक उमेदवार नितीन भाऊ चौदंते यांची उमेदवारी चर्चेत

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी योगेश चौदंते**

**मुदखेड :** आगामी नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपमध्ये जोरदार हालचाली सुरू झाल्या आहेत. मुदखेड शहरातील सामाजिक कार्यात सक्रिय आणि सर्वसामान्य जनतेच्या संपर्कात असलेले नितीन भाऊ चौदंते हे भाजप पक्षाकडून इच्छुक उमेदवार म्हणून चर्चेत आले आहेत.



नितीन भाऊ चौदंते यांनी अनेक सामाजिक उपक्रमांमधून जनतेचा विश्वास संपादन केला असून, त्यांच्या कार्यशैलीला तरुणांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्व स्तरातून चांगला प्रतिसाद मिळत आहे. स्थानिक पातळीवर विकासकामे, शिक्षण व स्वच्छतेसाठी त्यांचे प्रयत्न कायम उल्लेखनीय राहिले आहेत.

पक्षांतर्गत बैठकींमध्ये त्यांचे नाव प्रामुख्याने पुढे येत असून, नागरिकही “नितीन भाऊ चौदंते यांना संधी मिळावी” अशी अपेक्षा व्यक्त करत आहेत. आगामी निवडणुकीत त्यांच्या उमेदवारीची औपचारिक घोषणा होण्याची उत्सुकता मतदारांमध्ये दिसून येत आहे.

## श्री छत्रपती हायस्कूलचे मा देवानंद जगदाळे यांना हिंदूरत्न पुरस्काराने सन्मानीत

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

डॉ. मणिभाई देसाई मानवसेवा ट्रस्ट निती आयोग सलग्नीत आय एस ओ नामांकित संस्थेच्या वतीने भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल हिंन्दुरत्न पुरस्कार २०२५ जाहीर करण्यात आला पुरस्कार प्रदान करण्याचा वितरण समारंभ पुणे येथे शुक्रवार दि.३१ऑक्टोबर २०२५ रोजी सायं ५ वाजता देण्यात आला आला.डॉ रविंद्र भोळे आरोग्यसेवा केंद्र उरुळीकांचन सहकायनि जाहीर करण्यात येत असतो. त्यामध्ये श्री छत्रपती हायस्कूल सणसरचे वरिष्ठ लिपिक मा देवानंद जगदाळे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला



मा.देवानंद जगदाळे यांनी आपल्या जीवनात अनेक वर्षे प्रामाणिकपणे सेवा करत असल्यामुळे हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले राष्ट्रीय एकात्मता व सामाजिक क्रांतीकारी सेवा व समर्पित भावनेने शैक्षणिक क्षेत्रात सेवावृत्ती कार्यकरीत आहात आपण सामाजिक बांधीलकीची जाण व भान ठेवून राष्ट्रीय एकात्मता जोपासण्याचे कार्य अत्यंत निरलसपणे करीत आहात ते समाजाला भूषणावह व आदर्श आहे.हा पुरस्कार प्राप्त झालानंतर जगदाळे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव व केलेल्या कामाचे कौतुक सणसर परिसरातुन होत आहे.

## स्वातंत्र्य जागरणाचा शंखनाद म्हणजे वंदे मातरम - नामदेव एकशिंगे



**दैनिक युवक आधार**
**सेलू प्रतिनिधी शिवाजी पवार**

शहरातील भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई संचलित विवेकानंद प्राथमिक विद्यालयात 'वंदे मातरम' या राष्ट्रीय गीताच्या सार्ध शताब्दी महोत्सवानिमित्त (दि.०७ नोव्हेंबर)शुक्रवार रोजी विद्यार्थ्यांचा वंदे मातरम गीताचे सामुहिक गायन कार्यक्रम घेण्यात आला.व्यासपीठावर स्थानिक व्यवस्था मंडळाचे अध्यक्ष हरिभाऊ चौधरी,स्थानिक कार्यवाह उपेंद्र बेल्लुरकर यांची उपस्थिती होती. प्रमुख वक्ते म्हणुन मुख्याध्यापक नामदेव एकशिंगे होते ते पुढे म्हणाले की ,वंदे मातरम गीत स्वातंत्र्य संग्रामातील एक जाज्वल्य प्रतीक होते.१५० वर्षांपूर्वी लिहिलेले गीत आजही आपला आत्मा हलवून जातं कारण त्यात भक्ती,वेदना आणि प्रेम आहे म्हणूनच हे केवळ गीत नसून भारताचं धडधडत हृदय आहे असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनोद मंडलिक ,पद्य विजय चौधरी तर आभार अनिल कौसडीकर यांनी मानले.रागिणी जकाते व संच यांनी संपूर्ण वंदे मातरम गायले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिक्षक बंधू भगिनी तसेच कर्मचारी वर्ग यांनी सहकार्य केले.

## उरणमध्ये पंजाब वेअर हाऊस जवळ सापडलेल्या बेवारस जखमी इसमाचा उपचारादरम्यान मृत्यू

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण/प्रतिनिधी**

उरणमधील पंजाब स्टेट कंटेनर अँड वेअर हाऊसिंग कॉर्पोरेशन लिमिटेड येथे माल उतरवणे आणि साठवणे यासारख्या सेवा पुरवल्या जातात. कंटेनर आणि वेअर हाऊसिंग संबंधित सेवा दिल्या जातात. या वेअर हाऊस जवळ शनिवार दिनांक ७ नोव्हेंबर रोजी सकाळी ५.३०वाजता च्या सुमारास धतुम ब्रिज जवळ बेवारस जखमी इसम पडलेला सापडलेला होता. याचवेळी देविदास बाळू दाभोळकर हे आपल्या कामानिमित्त जात असताना हा बेवारस जखमी इसम त्यांना दिसल्यास त्यांनी उरण पोलीस ठाण्यात त्वरित कळवले असता उरण पोलीस ठाण्यातील व पोलीस हवालदार यांनी घटनास्थळी धाव



घेतली व जखमी इसमास त्वरित जे,जे, हॉस्पिटल मुंबई येथे दाखल केले.

हॉस्पिटलमध्ये दाखल केला असता या इसमाचा उपचारदरम्यान हा इसम मयत झाले असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.या बेवारस इसमाचा तपास उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हानीफ मुलानी यांच्या निरीक्षतेखाली पोलीस हवालदार दिनेश महाजन पुढील तपास करीत आहेत. तरी या इसमाची कोणत्याही माहिती मिळाल्यास किंवा ओळख पटल्यास ९८२१२४७७८० या क्रमांकावर त्वरित संपर्क करावा.

## गरीबीवर मात करून भाऊसाहेब सिरसाठ यांचा MBBS ला प्रवेश सारोळा गावाचा अभिमान

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :** 'इच्छा असेल तर मार्ग नक्की सापडतो' या वचनाची प्रचिती सारोळा येथील गरीब शेतकरी कुटुंबातील मुलगा भाऊसाहेब सिरसाठ याने आपल्या कर्तृत्वाने दिली आहे. कठीण परिस्थिती, मर्यादित साधनं, आणि आर्थिक अडचणी यावर मात करत त्याने MBBS शिक्षणासाठी थेट डॉ. हेडगेवार मेडिकल कॉलेज, छत्रपती संभाजीनगर येथे प्रवेश मिळवला आहे.भाऊसाहेब यांचे प्राथमिक शिक्षण गावी सारोळा येथे झाले. तर दहावी आणि बारावीचे शिक्षण सहकारमहर्षी कै. माणिकराव पालोदकर विद्यालय, पालोद येथे पूर्ण केले. शिक्षण घेताना त्याने कधीही आर्थिक अडचणींना अडथळा होऊ दिला नाही. अभ्यासावरील त्याची ओढ आणि चिकाटी पाहून शिक्षक व ग्रामस्थ नेहमीच त्याचे कौतुक करत



असत.घरची परिस्थिती हलाखीची असली तरीही आई-वडिलांनी मुलाच्या शिक्षणासाठी दिवस-रात्र कष्ट घेतले. त्याच्या यशामागे पालकांच्या त्यागाची आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाची मोठी देण आहे. भाऊसाहेबचा MBBS ला प्रवेश झाल्याची बातमी समजताच संपूर्ण सारोळा गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. ग्रामस्थांनी त्याचा सत्कार करून पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

## सिल्लोडमध्ये बेशिस्त वाहन पार्किंगमुळे वाहतुकीची कोंडी

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** शहराच्या सर्वाधिक वर्दळीच्या रस्त्यांपैकी एक असलेल्या प्रियदर्शनी चौक ते डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक दरम्यान बेशिस्त वाहनधारकामुळे वारंवार वाहतूक कोंडी होऊन वादाचे प्रसंग निर्माण होत असल्याने पोलिस प्रशासनाने याकडे तात्काळ लक्ष द्यावे अशी नागरिकांची मागणी होत आहे.

सध्या सिल्लोड शहरात बेशिस्त वाहन पार्किंग व वाहतूक कोंडीचा प्रश्न गंभीर बनला आहे. सम-विषम पार्किंग नियम सुरू होण्यापूर्वीच बंद झाले. गेल्या वर्षभरापासून या रस्त्याच्या दुतर्फा वाट्टेल तेथे वाहने उभी केली जात आहेत. त्यामुळे दिवसभरात वारंवार बेशिस्त पार्किंगमुळे वाहतूक कोंडीचा त्रास वाहनचालकांना सहन करावा लागत आहे. परिणामी अनेकदा वादाचे प्रसंग निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत आहे.या भागात नियमित गस्त व बेशिस्तांवर पोलीस प्रशासनाकडून कायदेशीर कारवाईची मागणी होत आहे.

शहरातील मुख्य रस्त्यावरील वाहनधारकांना शिस्त लावण्यासाठी वाहतूक पोलिसांनी नियमित गस्त घालून बेशिस्त पार्किंगला शिस्त लावावी, तसेच रस्त्यालगतच्या दुकानांसमोर सुरक्षारक्षकांची नेमणूक करण्यात येऊन व्यवस्थित पार्किंगच्या सूचना केल्या जाव्यात, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. मात्र, प्रत्यक्षात अनेक दुचाकी वाहन धारक शहरातील या मुख्य रस्त्यावरून कर्णकश आवाजात भरधाव वेगाने दुचाक्या पळवताना चे चित्र दिसते. अनेक अल्पवयीन मुले ट्रिपल सीट वाहने भरधाव वेगाने पळवितात. हा सर्व प्रकार पोलिस प्रशासनाच्या डोळ्यादेखत होत असला तरी याकडे दुर्लक्ष का केल्या जात आहे असा संतप्त सवाल नागरिकांमधून विचारला जात आहे.

अनेक दुकानदारांकडूनही बेशिस्तपणे वाहने उभी करणाऱ्या चालकांना हटकले जात नसल्याने नियम उल्लंघन वाढले आहे. यामुळे या रस्त्यावर वारंवार कोंडीची समस्या उद्भवत आहे.

शहरात लावलेल्या मुख्य रस्त्यावरील सीसीटीव्ही कॅमेराच्या मदतीने अशा बेशिस्त वाहनधारकावर पोलिसांनी कायदेशीर कारवाईचा बडगा उभारावा जेणेकरून पोलिस प्रशासन व कायद्याला न जुमानणाऱ्या अशा बेशिस्त वाहनधारकांना लगाम घालता येऊ शकेल.

## अतिक्रमणाच्या विळख्यात अटकलेल्या कामोठे शहराच्या दुरावस्थेत दिवसेंदिवस वाढ

### कब्जा माफियांच्या ताब्यात सिडकोचा भूखंड ...

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

महानगरपालिका हद्दीतील कामोठे प्लॉट.१३,सेक्टर ३२ येथे मोठ्या प्रमाणात DDSR च्या प्रकल्पाच्या बिल्डिंगचे काम सुरक्षेच्या दृष्टिकोनातून धोकादायक असून अनेक अडचणींना नागरिकांना सामोरे जावे लागत आहे . त्याच प्रकल्पाच्या समोरील सिडकोच्या भूखंडावर क्रिकेटचे टर्फ बेकायदेशीर पणे उभारल्याने सिडको व पालिकेच्या कार्यप्रणाली वर अनेक प्रश्न उपस्थित होत असताना दिसत आहे.

अतिक्रमणाचा शहर म्हणून नव्याने निर्माण झालेली ही कामोठे शहराची ओळख कामोठेकरांनाही अस्वस्थ करणारी आहे. रहदारीच्या मार्गावर उद्योग, व्यवसायिक बेकायदेशीर पणे




धंदा करत असून अनेक खुल्या पडलेल्या सिडकोंच्या भूखंडाचा वापर स्थानिक टोळ्यांचे माफिया करताना दिसत आहे .चौका चौकातील रस्त्यावरील हि दुकाने , हातगाड्या, आठवडे बाजार , चायनिज ,धाबे ,खेळ प्रशिक्षण, सरावा साठी उभारण्यात आलेले टॅर्फ तसेच विविध संस्थेच्या माध्यमातून कब्जा केले गेलेले एक न अनेक प्रकारच्या भूखंडा वर अतिक्रमणे वाढत आहे . या विरोधात अनेक समाज माध्यमातून गेली अनेक वर्षे प्रयत्न केले जात आहे. यावर औपचारिक म्हणून पालिकेच्या माध्यमातून तोडक कारवाई केलेली पाहता नंतर कुठल्याही प्रकारची ठोस कारवाई होत नसल्याने त्या माध्यमातून गंभीर स्वरूपाचे वाद ,विवाद होत कायदा सुव्य व्यवस्थेचा गंभीर प्रश्न ऐरणीवर येत आहे .

# तरुणांचा सामाजिक पुढाकार - लासलगाव-विंचूर रस्त्यावरील खड्डे स्वखर्चाने बुजविले!

## प्रशासन झोपेत असताना तरुणांनी दिला सामाजिक जबाबदारीचा संदेश

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**

**लासलगाव :** नाशिक जिल्ह्यातील लासलगाव-विंचूर हा एक अत्यंत महत्त्वाचा वाहतूक मार्ग असून या रस्त्यावरून दररोज हजारो वाहनांची वर्दळ असते. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून या रस्त्यावर ठिकठिकाणी खोल खड्डे पडल्याने वाहनचालकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. लहानमोठे अपघात वाढत चालल्याने नागरिकांत संताप उसळला होता.

प्रशासनाकडून काहीच हालचाल होत नसल्याचे पाहून अखेर लासलगावमधील काही सामाजिक जाण असलेले युवक स्वतः पुढे सरसावले. समाजासाठी काहीतरी करावे या भावनेतून या तरुणांनी स्वखर्चाने आणि स्वतःच्या



श्रमातून रस्त्यावरील छोटे-मोठे खड्डे बुजवण्याचे काम हाती घेतले.या उपक्रमासाठी राम बोराडे यांनी सर्व आवश्यक मटेरियल उपलब्ध करून दिले, तर महेश मोरे, कल्याण होळकर, ज्ञानेश्वर नेटारे, राजू कराड, चंदू बाबा मोरे, संदीप उगले, ओम चव्हाण, आकाश अहिरे, सुनील ठाकरे यांनी स्वतः श्रमदान करत रस्त्याचे काम पूर्ण केले. काही तासांतच रस्त्याचा चेहरामोहरा बदलला आणि प्रवाशांना थोडासा दिलासा मिळाला.

नागरिकांनी या युवकांच्या कार्याचे मनापासून कौतुक केले आहे. "प्रशासनाचे काम नागरिक करतात, हे दुर्दैव असले तरी या तरुणांनी दाखवलेला पुढाकार आदर्श आहे," अशी प्रतिक्रिया स्थानिक नागरिकांनी दिली.रस्त्यावरील खड्ड्यांमुळे होणारे अपघात रोखण्यासाठी युवकांनी घेतलेला हा पुढाकार सामाजिक बांधिलकीचे जिवंत उदाहरण ठरला आहे. आता नागरिकांची एकच अपेक्षा "प्रशासनाने या तरुणांचा आदर्श घेऊन कायमस्वरूपी दुरुस्तीचे काम हाती घ्यावे!"

# आष्टी तालुक्यात तरुण पिढी रंगली 'फुलचंद पाना'त तरुणांच्या आरोग्याला मोठा धोका

- पानात नशेली रासायनिक पदार्थ
- नशायुक्त पान आष्टी तालुक्यात पानटप-यांवर खुलेआम विक्री कारवाई करणार कोण?
- लोक म्हणतात एक बाटली पचतेय पण पान नाही, खाल्लकी किक बसते

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी : मारुती सत्रे**

पूर्वी प्रत्येकाच्या घरी पान खाण्यासाठी पानडब्बे असायची यामध्ये कात, चुना वापरुन साधे पान खायचे. परंतु अलीकडच्या काळात सध्या तालुक्यातील गावखेड्यापासून शहरापर्यंत तरुणाई मध्ये 'फुलचंद पान' खाण्याचा नवीन ट्रेंड आला असून मोठ्या प्रमाणावर नशायुक्त पान खाण्याची क्रेझ तरुणांमध्ये वाढत चालल्याचे दिसून येत आहे. तालुक्यात गावागावात सर्रास पानटप-



यांवर खुलेआम नशायुक्त पानाची विक्री होत आहे. तर या पानांमध्ये सुगंधी सुपारी, कात, चुना अन् अज्ञात नशीली रासायनिक पदार्थ बेसुमार मिसळले जाते असल्याने एक पान खाल्याने एका 'बाटली'ची नशा येते असे पान खाणारे सांगत आहेत. याचा दुष्परिणाम कोणी गुंग होतय, कोणी डोक धरतय, मळमळ, घाम फुटतो, उलट्या, चक्कर येणे अशा समस्या जाणवत आहेत. पहिल्यांदा पान खानारा तर विचारुच नका तो परत नावपण घेणार नाही इतकी बेजारी होतेय.अन् सवय लागली की तरुणाई आहारी जात आहे. नियमित सेवन केल्यास गंभीर आजार उद्भवण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी सर्वत्र प्रशासनाच्या नाकावर टिच्चून फुलचंद पानांची खुलेआम विक्री होत आहे. मात्र अद्यापपर्यंत प्रशासनाने कुठलीच कारवाई केली नसल्याने तरुण पिढी आहारी जात असल्याचे आष्टी तालुक्यातील नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे. तर अन्न औषध प्रशासन व पोलीस प्रशासन नेमके करते तरी काय? असा संतप्त सवाल तालुक्यातील जनतेतून उपस्थित केला आहे.

गावखेड्यापासून शहरांपर्यंत सगळीकडे सध्या सर्व शाळकरी मुले तरुण, नागरीकांमध्ये फुलचंद पानाची क्रेझ निर्माण झाली आहे. फुलचंद, पंचरत्न, नवरत्न व 120, 300 बनारस व कलव हे नशेली पानांचे प्रकार आहेत. या पानांमध्ये नशेली पावडर टाकली जाते असा संशय अनेकांनी व्यक्त केला असून याच्या एका पानात दारूच्या बाटली इतकी नशा आहे. हे फुलचंद पान खाणारे तरुण सांगत आहेत. या पानांमध्ये किमाम व तंबाखू वापरली जाते. किमाम तोंडात फिरतोय तस् खाणारा पण फिरतोय.पानात कोलीन आणि तंबाखूत निकोटीन असल्याने सहन नाही झाले तर छातीत दुखायला लागते. यामुळे कॅन्सर चा धोका वाढतो दात दुखणे, हिरड्या सुजणे, यासह अनेक प्रकारचा त्रास सहन करावा लागत आहे. आजकाल फुलचंद खाल्ले की चक्कर येऊन जमिनीवर बसायला लावतात. आता पानटपरी वाले पण सगळ्यांना एकच प्रकारे कडक बनवलेले पान देतात अगोदर मागितल्यानंतर पान बनवायचे. सर्व एकदाच बनवून दिले जाते पण ज्याला झेपत नाही तो 'तारे मोजतोय' खायला मज्जा वाटते पण एकदा सवयी लागली की लागली की दररोज आहारी जातोय. या फुलचंद पानामध्ये एक विशिष्ट प्रकारची सुस्ती, नशा आणि धुंदी येणारा गांजासारखा पदार्थ मिसळून त्याची विक्री केली जात असल्याचे अनेकजण सांगतात. हे पान खाण्यासाठी शहरी भागांतील अल्पवयीन मुलांसह ग्रामीण भागांतील मुलांमध्ये क्रेझ असल्याचे पाहायला मिळत आहे. काही विद्यार्थीही या पानामुळे व्यसनाधीन झालेले दिसत आहे. या नशायुक्त ' फुलचंद पाना'ची अगोदर १० रूपये व आता १५ रुपये इतकी किंमत असल्याची माहिती मिळत आहे. एखाद्या तरुणाने पहिल्यांदा हे पान खाल्ले तर त्याला मळमळ, उलट्या व चक्कर येते. तर विडा खाणाऱ्या तरुणांच्या पालकांना केवळ मुलाने पानच खाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे तो पालकांच्या नजरेतून वाचत चालला आहे.

# 95 गाव नवी मुंबई नैना व इतर प्रकल्पग्रस्त समिती बैठक

## प्रकल्पग्रस्तांच्या हितासाठी ठोस कार्यवाही - मंत्री गणेश नाईक

**दैनिक युवक आधार**
**नविमुंबई प्रतिनिधी**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ बाधित प्रकल्पग्रस्त शेतकरी बांधवांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत सिडको, पनवेल मनपा नवी मुंबई मनपा मधिल कंत्राटी कामगार मानधन कर्मचारी यांच्या मागण्या बाबत नवी मुंबई येथे प्रतिनिधी मंडळाने भेट घेतली. यावेळी बैठकीत ऍड. सुरेश ठाकूर (अध्यक्ष, 95 गाव नवी मुंबई नैना व इतर प्रकल्पग्रस्त समिती अध्यक्ष म्युनिसिपल एम्प्लॉइज युनियन), रमाकांत पाटील (कार्याध्यक्ष नवी मुंबई मुन्सिपल एम्प्लॉइज) युनियन, पुंडलिक म्हात्रे , सुनील कटेकर (जेष्ठ पत्रकार)सुधाकर कोळी प्रा. सुरेश रानडे (पर्यावरण तज्ञ) सुजीत पाटील (सचिव मुंबई लेबर युनियन) प्रीतम म्हसकर गणेश गुटे किशोर कोळी मंदार भोईर यांचा समावेश होता.या भेटीत प्रकल्पग्रस्त बांधवांच्या रोजगार, स्वयंरोजगार व पुनर्वसनाशी संबंधित मागण्यांबाबत



सविस्तर चर्चा करण्यात आली. नवी मुंबई विमानतळ बाधितांना नोकऱ्या व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येईल , विमानतळ प्रकल्पातील रोजगाराच्या संधींबाबत उद्योगपती गौतम अदानी यांच्याशी चर्चा करण्यात आली असून, विमानतळ बाधितांना विमानतळ प्राधिकरणात नोकऱ्या व हाऊसकीपिंग,लोडिंग-अनलोडिंग, उद्यान व इमारत देखभाल, दुरुस्ती आदी क्षेत्रांमध्ये स्वयंरोजगार (ठेके) संधी उपलब्ध करून देण्याबाबत लवकरच निर्णय घेण्यासाठी, समिती सदस्य व विमानतळ प्राधिकरण यांची बैठक घेण्यात येणार असल्याचे मंत्री गणेश नाईक यांनी सांगितले.

तसेच सिडको, नवी मुंबई महानगरपालिका व पनवेल महानगरपालिकेमध्ये कार्यरत असलेल्या सर्व प्रकल्पग्रस्त बांधवांना बारवी धरण प्रकल्पग्रस्त प्रमाणे कायमस्वरूपी नोकरीत सामावून घेण्यासाठी मंत्रालय स्तरावर लवकरच निर्णय घेतला जाणार आहे. या निर्णयामुळे पनवेल, उरण व नवी मुंबई परिसरातील हजारो प्रकल्पग्रस्त बांधवांना थेट लाभ होणार आहे.

सिडको महामंडळामध्ये कार्य कंत्राटी पद्धतीवर गेले दहा ते पंधरा वर्षांपासून काम करत असणाऱ्या लिपिक ,संगणक, चालक, शिपाई ,सुरक्षारक्षक, ड्रायव्हर ,अग्निशामक ,अभियंते यांना बारावी धरण प्रकल्पग्रस्तांच्या गतीवर महामंडळात कायमस्वरूपी समावेश करण्याबाबत योग्य ती प्रक्रिया राबवण्याच्या निर्देश दिले तसेच ही प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत संबंधित कर्मचाऱ्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या किमान वेतनानुसार वेतन देण्याबाबत महत्वपूर्ण चर्चा केली. त्याचप्रमाणे पनवेल मनपा कडे हस्तांतरित केलेले उद्यान विभागातील 92 कर्मचाऱ्यांना गेल्या आठ महिन्यापासून थकीत पगार देण्याबाबत निर्देश दिले.ही बैठक अत्यंत सकारात्मक व फलदायी ठरली असून, प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांसाठी स्वतः जातीन लक्ष घालणार असून त्याचा फायदा सर्व भूमिपुत्रांनी घ्यावा असे समितीच्या वतीने आव्हान करण्यात आला होता.

## २८ वर्षांची अखंड साईसेवा

# लालबाग ते शिर्डी 'ओम श्री साई समर्थ सेवा मंडळा'ची पवित्र पदयात्रा

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

"साईराम"च्या जयघोषात, ढोल-ताशांच्या निनादात आणि "सबका मालिक एक" या साईबाबांच्या संदेशाने गगन भारून टाकणारी ओम श्री साई समर्थ सेवा मंडळ (रजि.) लालबाग ते शिर्डी पदयात्रा यंदा २८ व्या वर्षात पदार्पण करत आहे.या पदयात्रेचे अध्यक्ष आणि साईभक्त महेश धुरी यांच्या मार्गदर्शनाखाली, भक्तीचा महासोहळा दरवर्षी लालबाग येथून प्रारंभ होऊन, ठाणे – भिवंडी – घोटी मार्गे शिर्डी येथे साईबाबांच्या चरणी विसावतो. साईभक्तांचा एक परिवार या आठ दिवसांच्या पदयात्रेत सुमारे २०० हून अधिक साईभक्त सहभागी होतात. दूरदूरवरून लालबाग, ठाणे ,भायंदर, रेवदंडा, अलिबाग, अमरावती आदी ठिकाणांहून साईभक्त प्रेमाने व श्रद्धेने या पालखी सोहळ्यात सामील होतात.रेवदंडा येथून महेश अधिकारी यांच्या सोबत तर विनायक कासार यांच्या नेतृत्वाखाली अनेक साईभक्त पदयात्रेला हजेरी लावतात.सर्व साईभक्त स्वतःच्या इच्छेने रेशन, पाणी, आवश्यक साहित्य घेऊन येतात. कारण त्यांच्यासाठी ही फक्त यात्रा नसून "साई परिवाराचा एकत्र सोहळा" असतो.ऊन्हात, पावसात, थंडीत... पण साईकृपा अखंड!या पदयात्रेची वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट म्हणजे गेले २८



वर्षांपासून एकही साईभक्त आजारी पडलेला नाही!पायी चालत असताना साईभक्त कुठेही थांबतात, जेवण बनवतात, नाश्ता करतात, पण प्रत्येक क्षणी साईबाबांच्या कृपेचा हात त्यांच्या डोक्यावर असतो.एकमेकांची काळजी घेणे, थकलेल्या भावाला हात देणे, आणि "साईराम" म्हणत पुढे चालत राहणे — हीच खरी साईसेवा आहे.शिर्डीत द्वारकामाईच्या साक्षीने भक्तीचा सोहळा,शिर्डीत पोहोचल्यावर साईभक्त द्वारकामाई, समाधी मंदिर व चावडी येथे दर्शन घेतात. त्या वेळी वातावरणात भक्तिभावाचे कंपन निर्माण होतात.भजन, कीर्तन, साईनामसंकीर्तन याने शिर्डी नगरी भारून जाते.कित्येक भक्त सांगतात, "आज आमच्याकडे दुकान, बंगला, व्यवसाय आहे, पण हे सर्व साईबाबांच्या कृपेनेच."भावपूर्ण अनुभवांची परंपरा पालखी शिर्डीला पोहोचल्यावर केवळ यात्रेचा शेवट होत नाही, तर भक्तीची नवी सुरूवात होते.भक्तांचे दर्शन घेताना साईबाबांची समाधी मंद स्मित करते, जणू म्हणते "तुम्ही चाललात माझ्यासाठी, मी आहे तुमच्यासोबत..."आयोजक मंडळाचे सर्व सदस्य साईभक्तांची काळजी घेतात, त्यांचा प्रवास सुखरूप पार पडावा म्हणून आवश्यक खर्चही मंडळ उचलते.हा सोहळा भक्तिभाव, समर्पण आणि एकतेचा अनोखा संगम आहे तन, मन आणि हृदयातून साईप्रेम वाहणारा. साईचा महिमा शब्दात न मावणारा. या पदयात्रेत सामील होणाऱ्या प्रत्येकाच्या मनात एकच भावना असते "साईबाबा, तुझ्या चरणी येताना आम्ही थकलो नाही, कारण तूच आम्हाला चालवतोस."आयोजक आणि साईभक्त सांगतात, "साईचा करिष्मा वर्णावा तेवढा कमीच आहे. प्रत्येक वर्षी नवे अनुभव, नवी ऊर्जा आणि नव्या भक्तीचा सागर घेऊन आम्ही पुन्हा निघतो."भक्तीचा संकल्प पुढील ५० वर्षेही अखंड राहो!"ही भक्ती अशीच अखंड पुढील ५० वर्षे चालू राहो, हीच आमची मनःपूर्वक इच्छा आहे आणि साईबाबांच्या कृपेने ती नक्कीच चालू राहील," असे विनायक कासार यांनी भावपूर्ण शब्दांत सांगितले."श्रद्धा आणि सबुरी हीच खरी संपत्ती आहे."आणि या २८ वर्षांच्या अखंड पदयात्रेने, ओम श्री साई समर्थ सेवा मंडळाने त्या वचनाला जिवंत अर्थ दिला आहे.

# खोटेपणाला मर्यादा हवी............!



वर्तमानात खोटेपणाला फारच महत्त्व आलेले दिसुन येते. खोटयालाही वेगळी चव असते. स्वतः बोलले तर गोड वाटते आणि दुसÚयानी बोलले तर कडू लागते. खोट बोला पण रेटून बोला असे आजचे युग आहे. लोक काय म्हणतील याचा सुध्दा विचार करीत नाही. पण याचा विचार करणे आवष्यक नाही काय? मनात खोट बोलण येतच कसं? जर आपण यात सकारात्मक दृश्टीकोणातुन विचार केला तर आणि मनातुन काढुन टाकले तर जिवनात प्रत्येक गोष्ट षक्य आहे. असे म्हणणे रास्ट ठरावे. खोट बोलल्याने आपण पुढच्या पिढीला/व्यक्तीला किंवा परिस्थितीला/ परिस्थितीची फसवणुक करीत आहे. असे नाही वाटत काय? याचे परिणाम काय होतील याचा सारासार विचार करणे अगत्याचे आहे. जर आपण नेहमी खोटयाला प्राधान्य दिले तर मनात खोटयाचा बाजार निर्माण होवुन मन नेहमी खोट संग्रह करतो व आपल्या स्वतःच्या मनावर ताबा मिळवतो. याचा अनुभव स्वतःलाच काही दिवसानी पहायला मिळतो. ''आहे ते जपता आलं की, पाहीजे ते मिळविता येते हे सत्य नाकारून चालणार नाही.

सुख व दुःख आपल्या कर्मानुसार मिळत असते याचा गरीब आणि श्रीमंताची काही संबंध नसतो. .....'' रडणारा महालातही रडतो आणि हसणारा झोपडीतही हसतो......! म्हणुन की काय खोटं बोलण हे कितपट बरोबर आहे. परमात्मा कधीच कोणाच भाग्य लिहीत नाही. भाग्य लिहीतात ते आपले विचार, व्यवहार आणि चांगले कर्म यामुळेच आपण याभुथलावर जिवन प्रवास करीत आहो. खोटे बोलणे सोपे वाटू षकते परंतु दिर्घकाळात ते अधिकच क्लिट असे शकते. म्हणुनच सत्यावर नेहमी प्रेम करा. खोटेपणामुळे नातं नश्ट होवु देवु नका. खोटेपणा माणसाला फक्त तात्पुरता सुख देतो पण, विष्वास कायम टिकुन राहत नाही. याचा विचार जिवन जगतांनी करणे गरजेचे नाही काय? या गोश्टीचा सकारात्मक विचार केल गेला तर त्याचे परिणाम विष्वासाने आपल्याला दिसुन येतील तेव्हा स्वतःला आनंदच होईल त्यावेळेस स्वतःची उंची दैःदिप्यमान होईल.

किंबहुना, सद्य परिस्थितीत आपले ईपीएस 95 पेन्शन धारक कसे हालाकीचे जीवन जगत आहे ते आपल्या सर्वांना माहित आहे. गेल्या 10 ते 15 वर्शापासुन पेन्षनवाढीकरीता लढा सुरू आहे. वर्श 2014 ला कोषीयारी समितीने रिपोर्ट या समवेत सर्वोच्च न्यायालयाचा निकाल दि. 22/11/2022 तसेच 10 ते 15 पेन्शन वाढीबाबत विविध समितीचे रिपोर्ट पेन्षन धारकाच्या बाजुने असुन सुध्दा वर्तमान सरकार या गोश्टीकडे लक्ष देत नाही. याला आपण काय म्हणाल? सरकार नेहमी खोटे आष्वासन देवुन जेश्ठ पेन्षनधारकाची फसवणुक करतो असे नाही वाटत काय. वर्तमानात सरकारने स्वतःकडून समितीला सकारात्मक पत्र देवुन सुध्दा पेन्षनमध्ये वाढ न करणे याचा अर्थ काय समजावे? अषी म्हणण्याची पाळी आम्हा पेन्शन धारकांवर का बरं यावी. वर्तमानात चांगले नावाजलेले पत्रकार सुध्दा युटयुब वर खोटया बातम्या देत असतात. परिणामतः आम्ही सर्व ईपीएस पेन्षन धारक दुःखीत आहो. आता वर्तमान सरकारवर, नेत्यावर कवडीचाही विश्वास राहिलेला नाही. असे सामान्य पेन्शन धारकाला वाटते. या बाबतीत ईपीएफओ अधिकाÚयाषी चर्चा केली असता असे निर्देषनास आले आहे की, सर्व डाटा तयार आहे पण, आदेष सरकार कडून अपेक्षीत आहे. मात्र आम्हाला या लेखाव्दारे सांगणे आहे की, सर्व डाटा तयार असतांना सरकारची पेन्षन वाढ देण्याची मानसिकतेची कुठे माशी शिंकली ? युटयुब वर सफसेस खोटया बातम्या देणे कृपया बंद करावे अषी सार्थ विनंती मी भारत सरकारला व चॅनल वाल्यांना करीत आहो. खोटेपणा फार जास्त दिवस टिकत नसते. एक दिवस त्याच भांड फुटल्याषिवाय राहणार नाही हे मात्र सत्य आहे. कोणत्याही गोश्टीला मर्यादा हवी अन्यथा हे जगणे पुर्णतः रूपाने नश्ट झाल्याषिवाय राहणार नाही. खोटयाचा फुगा तात्पुरता मोठा दिसतो पण फुटल्यावर काय परिस्थिती निर्माण होते हे आपल्याला भविश्यात दिसुन सर्वोच्च न्यायालयाचा अवमान आणि जेश्ठ पेन्षन धारकाचा अपमान याचे परिणाम भविश्यात होतीलच कारण खोटयाची चव जास्त दिवस टिकत नाही. पेन्षन वाढीसाठी देषात ज्या ज्या समित्या प्रयत्नषील आहे त्यांना अखेरपर्यंत यष हे मिळेलच. तेव्हा सरकारची म्हणुन वर्तमानात सकारात्मकतेने विचार करण्याची गरज आहे. खोटेपणाचा पुर जास्त दिवस टिकत नसतो. तो एक दिवस ओसरणार आहे. सत्याच्या मार्गावर/लोकांच्या कामावर (पेन्षन वाढीचा) भर झाला तर योग्य दिषेने तुमची आमची प्रगती होईल अन्यथा वर्तमानात असलेले नेत्यांचे चांगले दिवस भविश्यात घसरणीवर आल्याषिवाय राहणार नाही हे सत्य नाकारू शकत नाही.

जाता जाता ............ सत्याच्या मार्गाने चांगले गुण आत्मसात करा तेच खÚया अर्थाने जिवन प्रवासात / कार्य करणाÚया प्रवासात एक योध्दा बनुन आपल्या मागे उभे राहतात. त्याची प्रचीती निर्माण होवुन स्वतःला दिसते. खोटे बोलणे म्हणजेच जाणीव पुर्वक केलेली फसवणुकच होय. ती कोणत्याही स्वरूपाची का असेना? ईपीएस 95 पेन्षन लवकरच वाढ होत आहे अषा आषयाचे भावनिक पोस्ट युटयुब चॅनल / पत्रकार देत असतात. त्या कृपया पुर्णतः रूपाने बंद करण्याचे अगत्याचे आहे असे नाही वाटत काय? त्यामुळे सरकारची प्रतिमा जगभरात मलीन होत असते याचा विचार करणे अगत्याचे आहे. पेन्षन धारकाचा योग्य सन्मान करून येत्या दिवसात आयुश्याच्या संध्याकाळी पेन्षन वाढीबाबत वेळीच दिलासा देवुन खोटे आष्वासने देणे भविश्यात टाळावे. आपण सत्याच्या मागे असल्याने दडलेल्या आनंद गुणाचा षोध घेणे सहज सोपे जाते. खोटयाच्या मागे असल्याने स्वतः (मग कोणतेही क्षेत्र का असेना) चे मुल्यांकन कमी होत असते. खोटयाच्या शेजारी उभ राहण्यापेक्षा सत्याच्या षेजारी उभ राहुन नक्कीच मोठ होता येते. हे विसरून चालणार नाही. ईपीएस 95 पेन्शन धारकाचे वाढीव पेन्शन वर्तमान महागाईचा विचार सरकारला करावेच लागेल हिच वर्तमानाची खरी गरज आहे. सरकारने सकारात्मक विचार करून जेश्ठ पेन्षन धारकाला लवकरच योग्य दिलासा मिळेल याकरीता सरकारी दूरदृश्टी आणि भावनाचा विचार करणे अत्यावष्यक आहे. या अपेक्षासह लेखाला मी पुर्ण विराम देतो.

# वंदे मातरम्' राष्ट्रीय गीताचा 150 वा वर्धापनदिन उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**घाटकोपर, केतन भोज**

'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीताच्या 150 व्या वर्धापनदिनानिमित्त औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कुर्ला येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी 1876 मध्ये लिहिलेले 'वंदे मातरम्' हे गीत स्वातंत्र्यलढ्याच्या काळात राष्ट्राची प्रेरणा आणि अस्मिता जागवणारे प्रतीक ठरले होते. त्या ऐतिहासिक गीताचे स्मरण, गौरव व आदर व्यक्त करण्यासाठी मुंबई शहर व मुंबई उपनगरातील 12 आयटीआय संस्थांनी संयुक्तपणे हा कार्यक्रम साकारला.कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ रविंद्र आपटे उपस्थित होते. तसेच राष्ट्र सेविका समितीच्या बौद्धिक प्रमुख डॉ. प्रेरणा क्षीरसागर यांनी प्रमुख वक्त्या म्हणून मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांसमोर 'वंदे मातरम्'ची ऐतिहासिक पार्श्वभूमी, राष्ट्रीय भावना आणि आजच्या पिढीसाठीचा संदेश प्रभावी शैलीत मांडण्यात आला.सुमारे 5000 विद्यार्थी तसेच 480 अधिकारी व कर्मचारीवर्ग कार्यक्रमाला उपस्थित होते



. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम राबवण्यात आला.कार्यक्रमाला व्यवसाय प्रशिक्षण अधिकारी विलेश संख्ये तसेच पोलीस अधिकारी शरद शेटे यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भाषा शिक्षणतज्ञ रविंद्र आपटे यांनी भूषवले. लोअर परळ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेने 'वंदे मातरम्'च्या भावविश्वावर आधारित संगीत नाट्य सादर केले.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करून मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

## हळद पिकावर करप्याचा प्रादुर्भाव

# शिरूरआनंतपाळ तालुक्यासह अन्य गावांतील शेतकरी हवालदिल...

**दैनिक युवक आधार**
**प्रशांत ताबोळकर लातुर**

**शिरुरआनंतपाळ :** यावर्षी सततच्या पावसाने हळद पिकांवर मोठ्या प्रमाणात करपा रोगांचा प्रादुर्भाव झाल्याने पिकाची वाढ खुंटली. यामुळे उत्पादनात घट होणार असल्याचे शेतकरी सांगत आहेत. पावसाळ्यातही जास्त पाऊस पडला तरी परतीच्या पावसाने कहर केला व नंतर मोठ्या प्रमाणात धुके पडल्याने हळद पिकावर तांबोरा, पाने करपणे आणि सड अशा प्रकारच्या रोगांचा प्रादुर्भाव झाला.

शिरुरआनंतपाळ तालुक्यातील येरोळ, चामरगा, व आटोळा ता.चाकुर या दहा बारा कि.मी अंतरावर असलेल्या गाव या शिवारात हळद लागवडीचे क्षेत्र वाढले. ऊस पिकांना जास्त पाण्याची गरज असते त्यापेक्षा कमी पाण्यात फायदेशीर उत्पादन देणारे नगदी पीक म्हणून शेतकऱ्यांनी हळदची लागवड जास्त प्रमाणत केली.या पिकांवर १ ऑक्टोंबरनंतर तांबोरा, पानावर करपा रोग आढळून येत आहे. पानावर करपा लवकर येणारा तसेच उशिरा येणारा असे दोन प्रकार आहेत. यावर्षी दोनही पान करपे रोग एकाच वेळी आल्याने ४० ते ५० टक्के हळद पिकाचे नुकसान होऊ शकते. तसेच कंद माशीने हळदीचे कंद पोखरल्यामुळे बुरशीचा प्रादुर्भाव होऊन कंद कुजून सध्या धुके पडत असल्यामुळे हळद पिक पिवळे पडून कंदसड, करपा वाढला आहे.

यावर्षी सारखा पाऊस झाल्याने सर्वच पिकांचे



नुकसान झाले. शिरूरआनंतपाळ व चाकुर तालुका कृषी विभागाकडून या पट्यात हळद उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांना मार्गदर्शन मिळावे अशी मागणी हळद उत्पादकांतून होत आहे. शेतकरी महागामोलाची औषध फवारणी करुणही हळद पिकांवरचे रोग आटोक्यात येत नाहीत, त्यामुळे आर्थिक भुर्दंड शेतकऱ्यांना सोसावा लागत आहे असे आटोळा ता.चाकुर येथील शेतकरी व्यंकटराव लोहारे म्हणाले. कंद कुजमुळे हळदीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. याची दोन्ही प्रकारचे हळदीवरचे करपे एकाच वेळी आढळून येत असल्याने कीड रोगाने उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट होणार आहे.परतीच्या पावसानंतर धुके पडणे, यामुळे हळदीवर करपा, खोडमाशीचा प्रादुर्भाव वाढला. हळद पिकाना हळदीचे कोंब फुगण्याच्या अवस्थेत असतांनाच हळद पिकांना विविध रोगाने ग्रासले असल्याचे पांढरवाडी येथील शेतकरी श्रीराम तांबोळकर यांनी सांगितले.

# सीकेटी महाविद्यालयात वंदे मातरम् गीताच्या सार्ध शताब्दी समारोहाचे दिमाखदार आयोजन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** भारत देशाच्या स्वतंत्र्यता चळवळीत महत्वपूर्ण योगदान देणारे तथा प्रत्येक भारतीय नागरिकामध्ये राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करणारे वंदे मातरम् हे गीत बंकिमचंद्र चटोपाध्याय द्वारा ०७ नोव्हेंबर १८७५ रोजी रचले गेले, सदर गीतास १९५० रोजी राष्ट्रीय गीत म्हणून मान्यताप्राप्त झाली. या गीताच्या रचनेस ०७ नोव्हेंबर २०२५ रोजी १५० वर्षे पूर्ण होत असताना देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून व भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाच्या पुढाकाराने देशभरात वंदे मातरम् गीताचे सामुहिक गायन करण्याच्या सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या. याच धर्तीवर महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, न्यू पनवेल (अधिकारप्रदत्त स्वायत्त) च्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि महाराष्ट्रभूषण डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी औद्योगिक प्रशिक्षण संस्था पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने सीकेटी महाविद्यालयाच्या भव्य प्रांगणात शुक्रवार, दि. ०७ नोव्हेंबर रोजी वंदे मातरम् गीताचे सामुहिक गायन तथा सार्ध शताब्दी समारोहाचे दिमाखदार आयोजन करण्यात आले.

या समारोहाच्या अध्यक्षस्थानी पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर तर मुख्य अतिथी म्हणून पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे, पनवेलचे उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी पवन चांडक यांची प्रमुख उपस्थिती राहिली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पनवेल तहसीलदार मीनल भोसले, पनवेल महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त गणेश शेट्ये, उपायुक्त तथा परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, उपायुक्त प्रसेनजीत कार्लेकर, उपायुक्त रविकिरण घोडके, उपायुक्त सौरभ खर्गे, सहाय्यक आयुक्त रुपाली माने, शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण, पनवेल शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अभिजित अभंग, प्रवीण कदम, शिवछत्रपती पुरस्कार विजेते संजय कडू आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरवात भारतमातेच्या प्रतिमेने झाली, पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मा. श्री. मंगेश चितळे यांनी भारतमातेच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करत त्यास अभिवादन केले, तद्नंतर सर्व मान्यवरांच्याहस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. औपचारिक स्वागत समारोहामध्ये सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ. एस.के.पाटील आणि पनवेल आय.टी.आय. चे प्रभारी प्राचार्य विजय टीकोले यांच्याहस्ते व्यासपीठावरील मान्यवरांचे स्वागत झाल्यानंतर पनवेल तालुक्याच्या तहसीलदार मा. मीनल भोसले यांनी प्रास्ताविक सादर करताना वंदे मातरम् गीताची पार्श्वभूमी स्पष्ट करत त्याचे महत्व विशद केले. सर्व उपस्थित विद्यार्थी समूहास संबोधित करताना त्यांनी राष्ट्रीय गीतामधील महत्वपूर्ण घटकांचे आणि संकल्पनांचे तार्कीकपणे विश्लेषण केले.

प्रास्ताविकाचे संबोधन झाल्यानंतर पनवेल आय.टी.आय. मधील विद्यार्थीनिंनी आपल्या सुमधुर वाणीतून भारताचे राष्ट्रीयगीत वंदे मातरम् गीताचे गायन केले. यासोबतच व्यासपीठावरील उपस्थित सर्व मान्यवर, व्यासपीठासमोरील विद्यार्थी जनसमुहाने एक ताल आणि सुरात वंदे मातरम् गीताचे सामुहिक गायन केले व संपूर्ण वातावरण राष्ट्रभक्तीच्या भावनेने अभिभूत झाले.

राष्ट्रीय गीताच्या सामुहिक गायनानंतर समारोहाचे मुख्य वक्ते विवेक विचारमंचाच्या कोंकण प्रांताचे संयोजक विजय वेदपाठक यांनी सर्व सहभागी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वंदे मातरम् गीताचा इतिहास सांगितला, यासोबत १८५७ चे पहिले स्वातंत्र्य समर, मातृशात्तीचा जागर, राष्ट्रीय गीतच्या माध्यमातून भारतभूमीचे समर्पक पद्धतीने केलेले वर्णन आदींचा उल्लेख करत, कोणत्याही देशाच्या नागरिकाने त्याच्या देशाला मातेचा दर्जा देणारे एकमेव राष्ट्र म्हणजे भारत राष्ट्र असल्याचे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे मुख्य अतिथी यांनी सर्व विद्यार्थ्यांशी हितगुज साधत वंदेमातरम् गीतामधील प्रत्येक नैतिक मूल्याचा आणि संकल्पनेचा अर्थ समजून एक जबाबदार नागरिकांप्रमाणे आपली सर्व कर्तव्ये यथायोग्य पद्धतीने पार पाडण्याबाबत भाष्य केले. सरतेशेवटी श्री. डी.डी. विसपुते महाविद्यालय, विचुंबे च्या चमूने पथनाट्याच्या माध्यमातून धर्म, जात, प्रांत, भाषा यांपासून वर येत आपण प्रथमतः भारतीय आहोत असा संदेश दिला. कार्यक्रमाची सांगता पनवेल आय.टी.आय. चे मा. दीपक बाग्कर यांच्या आभार प्रदर्शनाने झाली. तर सूत्रसंचालन महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे मुख्य कार्यक्रम अधिकारी प्रा. आकाश पाटील यांनी केले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेचे अध्यक्ष डॉ. राजेश येवले, मुख्य कार्यक्रम अधिकारी प्रा. आकाश पाटील, कार्यक्रम अधिकारी प्रा. आलोक भानुशाली, प्रा. सुशीलकुमार घाडगे, एन.एस. एस. विषय समन्वयक प्रा. रुपेश माने. यासोबतच पनवेल आय.टी. आय. चे प्रभारी प्राचार्य मा. श्री. विजय टीकोले नेतृत्वाखाली यांच्या समवेत त्यांच्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारीवर्ग आणि स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

# जरंडीचा आदर्श राज्यभरात राबवू - अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळुंके

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव प्रतिनिधी विजय काळे**

**सोयगाव :** तालुकाततील जरंडी गावचे काम सर्वच बाबी मध्ये आदर्शवत आहे त्यामुळे जरंडी गावाचा नाव लौकिक राज्यात दरवळन्यास आता कोणीही रोखू शकत नाही मात्र जरंडी ग्रामपंचायत राज्यात रोल मॉडेल ठरली आहे त्यामुळे जरंडी पॅटर्न आता राज्यात राबविण्यासाठी शिफारस करण्यात येईल असे मत जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळुंके यांनी शुक्रवारी(ता.०७) जरंडी भेटी दरम्यान केले शुक्रवारी सायंकाळी पाच वाजेच्या दरम्यान अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळुंके याच्यासह गटविकास अधिकारी शिवाजी यमूलवाड,उप अभियंता प्रवीण फुलारी,शाखा अभियंता राजेश राजगुरू, विस्तार




अधिकारी अशोक दौड यांनी जरंडी येथे भेट दिली यावेळी त्यांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत झालेल्या कामांचा व अभियानाचा आढावा घेतला हुतात्मा राजहंस स्मारक गार्डन,घनदाट वृक्षारोपण, ऑक्सिजन पार्क,व्यायाम शाळा,जेष्ट नागरिक कक्ष,सुसज अभ्यासिका, स्मशानभूमी,व त्या ठिकाणच्या वृक्ष लागवड, बोलकी वृक्ष,यासह गावातील विविध उपक्रम आणि विकास कामांची पाहणी केली हुतात्मा स्मारक परिसरातील ऑक्सिजन पार्क मध्ये चक्क दोन तास अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळुंके रमले होते दरम्यान यावेळी त्यांनी पक्षांचा किलबिलाट असलेली शाळा, संगीत कारंजे,बदक पालन केंद्र, आदी उपक्रमांची पाहणी केली,यावेळी त्यांनी हुतात्मा स्मारकात असलेल्या पक्षांची माहिती घेतली दरम्यान मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत झालेल्या विविध कामांची पाहणी करून या अभियानाचा आढावा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सोळुंके यांनी घेतला ग्रामपंचायत अधिकारी सुनील मंगरुळे यांनी अभियानात राबविण्यात आलेल्या उपक्रमाची माहिती दिली आरोग्य, शिक्षण, कर वसुली, पाणी पुरवठा, व ग्रामपंचायतचे रेकॉर्ड याबाबत त्यांनी सूचनाही दिल्या यावेळी सरपंच स्वाती पाटील,उपसरपंच संजय पाटील,दिलीप पाटील,मधुकर पाटील,कृषिभूषण रवींद्र पाटील,माजी पंचायत समितीचे सदस्य संजीवन सोनवणे,बनेखा तडवी, अमृत राठोड,मधुकर सोनवणे,दिलीप मोघडे आदींची उपस्थिती होती संतोष पाटील, सतिष बाविस्कर, अंबु राठोड, भास्कर निकम् आदींनी पुढाकार घेतला..

# वालूर येथील मुख्य रस्त्यालगत असलेली कचरा कुंडी हटविण्याची ग्रामस्थांची मागणी

**दैनिक युवक आधार**
**सेलू प्रतिनिधी शिवाजी पवार**

सेलू तालुक्यातील वालूर येथील ग्रामस्थांनी गावातील मुख्य रस्त्यालगत असलेली कचरा कुंडी तातडीने हटविण्याची मागणी केली आहे. या संदर्भात विशाल भगवान चाकोते यांनी 08/11/2025 रोजी ग्रामपंचायत कार्यालयाकडे लेखी निवेदन दिले आहे. निवेदनात म्हटले आहे की, गावात पाण्याच्या टाकीजवळ मुख्य रस्त्यालगत असलेली कचरा कुंडी अत्यंत दुर्गंधीयुक्त झाली असून.त्यामुळे परिसरातील नागरिकांना तसेच लहान मुलांना त्रास होत आहे. विशेष बाब ही कचराकुंडी गावाला ज्या ठिकाणावरून पाणीपुरवठा केला जातो त्याच ठिकाणी आहे .या ठिकाणावरून काही अंतरावरच अंगणवाडी सुद्धा आहे .या कुंडीत सतत कचरा साचल्याने डासांचा प्रादुर्भाव वाढला असून नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.चाकोते यांनी ग्रामपंचायतीकडे तातडीने संबंधित कर्मचाऱ्यांना पाठवून ही कचरा कुंडी हटविण्याची मागणी केली आहे. या निवेदनावर दत्ता उत्तम शिंदे यांचीही स्वाक्षरी असून नागरिकांनी प्रशासनाने त्वरीत कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.



**वालुर येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प फक्त नावालाच**

**वालुर हे जवळपास २० हजार लोकसंख्या असलेले गाव आहे .शासनाचा लाखो रुपये निधी खर्च करून घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प उभा केला आहे .पण यात कुठलेही कचरा व्यवस्थापन होत नाही .हा प्रकल्प केवळ शोपिस म्हणून दिमाखात उभा आहे .यावर ग्रामपंचायत वालुर यांनी लक्ष देणे गरजेचे आहे .**

**- बालाजी हरकळ नागरिक वालुर**

# कामोठे पोलीस स्टेशन हद्दीत आढळला बेवारस मृतदेह

**दैनिक युवक आधार**

**पनवेल / प्रतिनिधी :** कामोठे बिट मार्शल यांना माहिती मिळाली की पुरषार्थ पेट्रोलपंपा समोरील सायन पनवेल हायवेच्या ब्रिज समोरील मुंबई कडे जाणाऱ्या सर्व्हिस रस्त्याच्या बाजुला असेलेल्या खाडीमध्ये एका अनोळखी इसमाची बॉडी तरंगत अवस्थेत पाहायला मिळाली .फायरब्रिगेडच्या माध्यमातून मदत कार्य घेत सदर मृत व्यक्ती पुरुष जातीच असल्याने सदर वैद्यकीय अहवालासाठी बेवारस इसमाची बोंडी उपजिल्हा रुग्णालय, पनवेल, जि. प .येथे पाठविण्यात आली. सदर व्यक्तीची ओळख पटावी म्हणून मयत इसमाचे वर्णण पुढील प्रमाणे आहे.

१) अंदाजे वय ४० ते ४५ वर्षे



२) उजव्या हाताच्या मनगटावर व दंडावर टेटू (गोंदण)

३) पाण्यात जास्त काळ राहील्याने वर्ण मृतदेह फुगलेला

(४) नेसणीस : मोरपंखी गडद निळ्या रंगाचा पूर्ण बाहयाचा शर्ट ज्यावर BLACK and WHITE 40 असे लिहीलेले आहे. तरी या बेवारस व्यक्तीबाबत काही माहिती मिळाल्यास सहाय्यक पोलीस निरीक्षक अरविंद मसलकर ८८५०७१०४६१ अथवा कामोठे पोलीस ठाणे येथे संपर्क साधावा.




# क्रियाशील मासेमार' सिद्ध होताच न्याय! - पाचपहूर मत्स्य संस्थेत दोन तरुणांना सभासद करून घेण्याचे आदेश

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी**

**जितेंद्र खोडे पांढरकवडा :-**यवतमाळ जिल्ह्याच्या सहकारी क्षेत्रात एका महत्त्वपूर्ण आदेशामुळे भूजलाशयीन पाचपहूर मत्स्य व्यवसाय सहकारी संस्था मर्यादित,पाचपहूर (ता.झरी जामणी) यांना मोठा धक्का बसला आहे.केवळ 'रोजगार कमी पडेल' या कारणास्तव संस्थेने सभासदत्व नाकारलेल्या दोन 'भोई' (पारंपरिक मासेमार) तरुणांना,सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), यवतमाळ यांनी सभासद करून घेण्याचे थेट आदेश दिले आहेत.या निर्णयामुळे मासेमारी व्यवसायावर अवलंबून असलेल्या बेरोजगार तरुणांना मोठा दिलासा मिळाला आहे.

नेमके काय घडले? बोरगाव (कडू) येथील रहिवासी असलेले श्री. प्रफुल वासुदेव नान्ने आणि श्री. प्रफुल अशोक शिवकर यांनी भूजलाशयीन पाचपहूर मत्स्य व्यवसाय सहकारी संस्थेकडे सभासदत्वासाठी अर्ज केला होता. बेरोजगार असलेल्या या तरुणांना मासेमारीचा पारंपरिक अनुभव आहे आणि रोजगार मिळवण्यासाठी सभासदत्व आवश्यक होते.

संस्थेचा नकार: संस्थेचे अध्यक्ष व सचिवांनी 'संस्थेतील ६८ सभासदांनाच पुरेसा रोजगार मिळत नाही, त्यामुळे संख्या वाढल्यास आर्थिक क्षमतेवर विपरीत परिणाम होईल' हे कारण देत त्यांचा अर्ज फेटाळला. त्यांनी तरुणांना केवळ 'नाममात्र





सभासद' होण्याचा पर्यायी प्रस्ताव दिला.

न्यायासाठी अपील: संस्थेच्या या निर्णयामुळे व्यथित झालेल्या तरुणांनी महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० च्या कलम २३ नुसार जिल्हा दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी (सहाय्यक निबंधक) यांच्याकडे अपील दाखल केले.

**तपासणीत 'मासेमार' सिद्ध!**

सहाय्यक निबंधक, श्री. अनिल नाईक यांनी या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन, मासेमारी संस्थेच्या नियमांनुसार तांत्रिक तपासणीचे आदेश दिले.सर्वात महत्त्वाचा टप्पा: मा. सहाय्यक आयुक्त मत्स्य व्यवसाय जि.यवतमाळ यांच्या कार्यालयाने दिनांक ०६/०३/२०२५ रोजी पाचपहूर तलावात दोन्ही अपीलकर्त्यांची तांत्रिक क्रियाशीलतेची तपासणी घेतली. तपासणीदरम्यान, प्रफुल नान्ने आणि प्रफुल शिवरकर यांनी अधिकाऱ्यांसमक्ष यशस्वीरित्या पोहून दाखवले आणि जाळे मारून मासेमारीचे प्रात्यक्षिक यशस्वीरीत्या पूर्ण केले. या अहवालात ते 'क्रियाशील मासेमार' असल्याचे सिद्ध झाले.

**निबंधकांचा ऐतिहासिक आदेश**

तोंडी आणि लेखी युक्तिवाद, तसेच तांत्रिक तपासणी अहवाल तपासल्यानंतर निबंधक श्री. नाईक यांनी संस्थेचा नकार अमान्य केला.

निर्णयाचा आधार: महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २३(१) स्पष्ट करते की, पात्र व्यक्तीस पुरेसे कारण असल्याशिवाय सभासद म्हणून दाखल करून घेण्यास संस्था नकार देऊ शकत नाही.

अंतिम आदेश (१७/०४/२०२५): सहाय्यक निबंधकांनी दोन्ही अपीलकर्त्यांचे अपील अंशतः मान्य केले आणि भूजलाशयीन पाचपहूर मत्स्य व्यवसाय सहकारी संस्थेला तत्काळ अपीलार्थींना कायद्यातील व उपविधीतील तरतुदीनुसार पूर्ण सभासद करून घेण्याचे आदेश दिले.

हा आदेश सहकारी संस्थेच्या मनमानी कारभारावर निर्बंध लावणारा आणि खऱ्या गरजू व पात्र व्यक्तींना न्याय मिळवून देणारा ठरला आहे. कायद्यापुढे संस्थेची 'आर्थिक भीती' टिकू शकली नाही आणि 'क्रियाशील मासेमार' असणे, हाच सभासदत्वाचा खरा निकष ठरला.

# स्पर्धेच्या युगात युवकांनी व्यवसायाकडे वळण्याची गरज - युवा नेते सागर धस

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) -** सध्याचे युग हे प्रचंड स्पर्धेचे बनले आहे. शिक्षण, नोकरी, शेती, उद्योग अशा सर्वच क्षेत्रात आज चुरशीची स्पर्धा निर्माण झाली आहे. शिक्षणाचा खर्च झपाट्याने वाढत असून नोकरीच्या संधी मर्यादित झाल्या आहेत. त्यातच निसर्गाचा असमतोल वाढल्यामुळे शेतीसारखा पारंपरिक व्यवसायही दिवसेंदिवस जोखमीचा होत चालला आहे. अशा परिस्थितीत युवकांनी केवळ नोकरीच्या किंवा शेतीच्या आशेवर राहता कामा




नये, तर स्वतःचा व्यवसाय उभा करून आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करावी. असे स्पष्ट प्रतिपादन युवा नेते सागर धस यांनी केले. पाटोदा शहरात नुकताच एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला सामाजिक, राजकीय आणि धार्मिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली. या प्रसंगी विठ्ठल-रुक्मिणी संस्थानचे प्रमुख ह.भ.प.सतीश महाराज उरणकर, युवा नेते सागर धस, नगराध्यक्ष राजूभैय्या जाधव शेतकरी कामगार पक्षाचे बीड जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) तालुकाध्यक्ष आनंद जाधव, माजी जिल्हा परिषद सभापती महेंद्र गर्जे, सोमीनाथ कोल्हे आदी मान्यवर उपस्थित होते. या वेळी बोलताना सागर धस म्हणाले, “आजच्या काळात यशस्वी होण्यासाठी धाडस, दृष्टीकोन आणि मेहनत या तिन्ही गोष्टींचा संगम आवश्यक आहे. कोणताही व्यवसाय प्रामाणिकपणे, इमानदारीने आणि सचोटीने केल्यास नक्कीच यश मिळते. तरुण पिढीने केवळ सरकारी किंवा खाजगी नोकरीकडे न पाहता स्वतःचे काही तरी निर्माण करण्याची जिद्द बाळगली पाहिजे. आर्थिक समतोल राखायचा असेल तर उत्पन्नाचे विविध स्त्रोत असणे गरजेचे आहे.” कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुशील ढोले यांनी केले. तर मान्यवरांचे स्वागत अनिल ढोले यांनी केले. आभार प्रदर्शन अक्षय जाधव यांनी केले. या प्रसंगी नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# उपनगर जिल्हास्तरीय कॅडेट स्पर्धा उत्साहात संपन्न

## सुवर्णपदक विजेते खेळाडू राज्यस्तरावर करणार प्रतिनिधित्व

**दैनिक युवक आधार**
**घाटकोपर, केतन भोज**

मुंबई उपनगर जिल्ह्याच्या 12 ते 14 वयोगटातील कॅडेट खेळाडूंसाठी घेतलेली जिल्हास्तरीय स्पर्धा मीनाताई ठाकरे मैदान, चेंबूर वाशी नाका येथे उत्साहात पार पडली. स्पर्धेला मुलांकडून मोठा प्रतिसाद मिळत, विविध गटांत जलद, दमदार आणि कौशल्यपूर्ण खेळांचे प्रदर्शन पाहायला मिळाले.या स्पर्धेत सुवर्ण पदक पटकावणारे खेळाडू मुंबई उपनगर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व राज्यस्तरावरील स्पर्धेत करणार आहेत. त्यामुळे खेळाडूंमध्ये उत्साह आणि आनंदाचे वातावरण असल्याचे सांगण्यात आले.कार्यक्रमास जिल्ह्याचे सचिव जयदीप कदम, खजिनदार संतोष वस्त, मुंबई जिल्ह्याचे सचिव विजय कांबळे, अनिल




रोडे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच स्पर्धा निरीक्षक म्हणून रेल्वे पोलीस दलाचे प्रशिक्षक अजय लोखंडे यांनी मार्गदर्शन केले.जिल्हास्तरीय पातळीवरून राज्यस्तराकडे खेळाडूंची वाटचाल निश्चित करणारी ही स्पर्धा यशस्वीपणे पार पडल्याने पालक, प्रशिक्षक आणि आयोजकांनी समाधान व्यक्त केले.

# खासदार सुनील तटकरे आणि नामदार अदितीताई तटकरे यांच्या हस्ते पेण तर्फे तळे येथील विविध विकासकामांचे भूमिपूजन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

बोरघर / माणगाव ( विश्वास गायकवाड. ) शनिवार दिनांक ०८ / ११ / २०२५ रोजी पेण तर्फे तळे येथील विविध विकासकामांचे भूमिपूजन कोकणचे भाग्यविधाते, महाराष्ट्राची शान राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी प्रांताध्यक्ष , चेअरमन , भारतीय पेट्रोलिअम व नॅशनल गॅस नियामक मंडळ,भारत सरकार , कार्यसम्राट खासदार सुनील तटकरे महिला व बालकल्याण महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे माणगाव तालुका पदाधिकारी आणि पेण, आमडोशी, बोरघर, चेरवली , खरवली , सुरव येथील राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे असंख महिला, पुरुष कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

खासदार श्री. सुनिलजी तटकरे साहेब यांच्या आशिर्वादाने मौजे पेण तर्फे तळे गावातील पोटले आळी येथील विकास कामाचे भूमिपुजन व नवघर भावकी येथील सभामंडपाचे उद्घाटन सोहळा शनिवार, दिनांक ०८ /११ / २०२५ रोजी सायंकाळी ३.०० वाजता आयोजित करण्यात आला होता.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नितीन चांदोरकर, योगेश पेणकर यांनी केले तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यानंद अधिकारी यांनी केले. तद्नंतर खासदार सुनील तटकरे यांनी उपस्थितांसमोर आपले मनोगत व्यक्त केले. त्या नंतर पेण तर्फे तळे येथील भागोजी बुवा पोटले, सुनील भोसले, मनोज पेणकर, नरेंद्र पेणकर, यश पेणकर, सचिव काशीम,स्वयम वडेकर,मंथन पेणकर, आदिनाथ जाबडे,करण माने, समीर मोंडे, चंद्रकांत इप्ते, यशवंत डिके इत्यादींनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात जाहीर पक्ष प्रवेश केला.

या कार्यक्रमाला श्री. सुभाषजी केकाणे कार्याध्यक्ष, रा.कॉ.पा. रायगड,श्री. शेखरशेठ देशमुख उपाध्यक्ष, रा.जि.रा.कॉं. पा.,महादेवजी बक्कम जिल्हा चिटणीस, रा.कॉ.पा.,श्री. दिपकशेठ जाधव प्रदेश सचिव, रा.कॉं. युवक पार्टी,श्री. बाळाराम नवगणे तालुका अध्यक्ष, रा.कॉं.पा.,श्री. राजेंद्र शिर्के तालुका सरचिटणीस, रा.कॉं.पा.,सौ. संगिता बक्कम महिला ता. अध्यक्षा, रा.कॉ.पा.,श्री. सुशिल दसवते कार्याध्यक्ष, रा.कॉ.पा.मा. ता.,श्री. शैलेश भोनकर अध्यक्ष, तळाशेत वि. रा.कॉ.पा.,श्री. गजानन अधिकारी जेष्ठ नेते, रा.कॉ.पा.,श्री. हुसेन रहाटविलकर उपाध्यक्ष, रा.कॉ.पा.मा.ता.,श्री. राजेंद्र जाधव अध्यक्ष, साई गण रा. कॉ. पा.,श्री. संदेश मालोरे जेष्ठ नेते, रा.कॉ.पा.,श्री. उदय अधिकारी जेष्ठ नेते, रा.कॉ.पा.,श्री. नितीन खडतर जेष्ठ नेते, रा.कॉ.



पा.,श्री. रमेश मोरे जेष्ठ नेते, रा.कॉ.पा.,श्री. संतोषभाई खडतर सरपंच, ग्रामपंचायत खरवली,श्री. नामदेव कासारे उपाध्यक्ष, रा.कॉं. पा.मा.ता.,श्री. बळीराम लाड जेष्ठ नेते, रा.कॉ. पा.,श्री. ऋषिकेश दसवते युवक अध्यक्ष, पं. स. गण,श्री. प्रशांत मोरे नेते, रा.कॉं.पा.,श्री. गणेश घुलघुले अध्यक्ष, गांवकमिटी आमडोशी,श्री. राजारामबुवा जाधव अध्यक्ष, गांवकमिटी बोरघर,श्री. विनोद सुतार नेते, रा. कॉ.पा.,श्री. नथुराम जाधव नेते, रा.का.पा.,श्री. मोतिराम घुलघुले जेष्ठ नेते, रा.कॉ.पा., सौ. शितल चं. शिंदे उपाध्यक्षा, महिला रा. कॉ.पा.,ॲड. दिनेश वारेकर नेते, रा. कॉ.पा.,श्री. वैष्णव साठे सरपंच, मु. ग्रा.पं. वारक,श्री. मारूती भावे मा. सरपंच, सु. ग्रा. पं. पेण, सौ. विनया पवार सदस्या, मु. ग्रा. पं. खरवली मा. सरपंच, सुरव/ तळे सौ. अल्पा जाधव,श्री. संजय वाघ पोलीस पाटील, आमडोशी,श्री. राजाराम मोहे जेष्ठ नेते, रा.कॉ.पा.,श्री. सुभाष गुगले नेते, रा.कॉ. पा.,श्री. सखाराम खरंगटे जेष्ठ नेते, रा.कॉ. पा.,श्री. दिलीप जाधव नेते, रा.कॉ.पा.,श्री. दिलीप लहाने जेष्ठ नेते, रा.कॉ.पा.,श्री. प्रसाद अंबुर्ले नेते, रा.कॉ.पा.,श्री. प्रकाश दहिंबेकर जेष्ठ नेते, रा.कॉ.पा.,श्री. मुकूंद वाढवळ नेते, रा.कॉ.पा.,श्री. दिपक चव्हाण नेते, रा.कॉं. पा.,श्री. सदाशिव कठे जेष्ठ नेते, रा.कॉं.पा.,सौ. सरिता ढाकवळ मा. सरपंच, साले,श्री. एकनाथ शिगवण जेष्ठ नेते, रा.कॉ.पा.,श्री. वैभव सत्वे पत्रकार,श्री. तुषार करकरे युवक उपाध्यक्ष, साई गण,श्री. रविंद्र अर्बन चिटणीस, रा.कॉं.पा.मा. ता.,श्री.नथुराम खडतर जेष्ठ नेते, रा. कॉ. पा.,श्री. रामचंद्र भोनकर जेष्ठ नेते, रा.कॉ.पा.,श्री. विलास मोरे जेष्ठ नेते, रा.कॉ.पा.,श्री. प्रविण पाखुर्डे जेष्ठ नेते, रा.कॉ.पा.,श्री. मनोहर वाघरे,सरपंच, यु. ग्रा. पं. पेण,श्री. काशिराम लहाने जेष्ठ नेते, रा.कॉ.पा.,श्री. महादेव खडतर मा. सरपंच, खरवली,श्री. विश्वास गायकवाड पत्रकार,सौ. सान्वी चव्हाण पोलिस पाटील, पेण,श्री. मधुकर अर्बन नेते, रा.कॉं.पा.,श्री. विजय बक्कम युवा नेते, रा.कॉं.पा.,श्री. बेंडखळे गुरूजी जेष्ठ नेते, रा.कॉ.पा.,श्री. शिवरामबुवा पोटले जेष्ठ नेते, रा.कॉं.पा.,श्री. रमेश शिगवण जेष्ठ नेते, रा. कॉं. पा. श्री. विद्यानंद अधिकारी,श्री. देवजी माने,श्री. नितीन चांदोरकर,श्री. सिताराम पोटले,श्री. विनायक गुळवणी,श्री. भागोजीबुवा पोटले,श्री. कृष्णा मोंडे,श्री. दगडू पाखड,श्री. राम कालप,श्री. परशुराम पोटले,श्री. मनोज पेणकर,श्री. अविनाश मोंडे,श्री. नामदेव ताम्हणकर,श्री. नामदेव शेडगे,श्री. विजय आरसे,श्री. सुभाष पोटले,श्री. गणेश वडेकर,श्री. सुरेश पोटले,श्री. प्रदिप मोडे,श्री. बाळाजी कालप,श्री. अनंत वडेकर,श्री. सखाराम पोटले,श्री. मोरेश्वर पोटले,श्री. संजय आरसे,श्री. आत्माराम पोटले,श्री. लक्ष्मण पोटले,श्री. प्रविण पोटले,श्री. प्रभाकर पोटले,श्री. दिनेश पोटले,श्री. संतोष पोटले,श्री. आजित शेडगे,श्री. रमेश चव्हाण,श्री. एकनाथ भागडे,श्री. सुर्यकांत पेणकर,श्री. नथुराम मांडवकर,श्री. उमेश कासारे,श्री. तेजस वडेकर,श्री. सुभाष पेणकर,श्री. नारायण पोटले,श्री. गुणाजी पोटले,श्री. नारायण इप्ते,श्री. सखाराम जाबडे,श्री. रोहित मोरे,श्री. उमेश कासारे,श्री. उदय माने,श्री. उत्तम कासारे,श्री. रमेश पोटले,श्री. महादेव मोंडे,श्री. नारायण मोंडे,श्री. विश्वनाथ ढवळ,श्री. ज्ञानेश्वर ढवळ,श्री. सुभाष पोटले,श्री. संदिप निंगावले,श्री. केशव मोंडे,श्री. जितेंद्र मोंडे,श्री. योगेश पेणकर,श्री. शैलेश वडेकर,श्री. राजेश मोंडे,श्री. मंगेश कासारे,श्री. कृष्णा पोटले,श्री. मंगेश पोटले,श्री. प्रकाश मांडवकर, पत्रकार श्री. विश्वास गायकवाड ,श्री. हेमंत पोटले.श्री. रूपेश पोटले,श्री. मारूती पोटले,श्री. काशिराम कालप,श्री. यशवंत डिके,श्री. विनायक मोंडे,श्री. अरूण चांदोरकर,श्री. सहदेव पोटले,श्री. सुनिल भोसले,श्री. जनार्दन पाबरेकर,श्री. अनिल निंगावले,श्री. राजेश भावे, श्री.किशोर पोटले,ग्रामस्थ, महिला व मुंबईकर मंडळ, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी पेण/ तळे मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पेण-खोपोली रस्त्यावर भीषण अपघात! दहा चाकी ट्रक पलटी — सुदैवाने जीवितहानी टळली

### शिरवली हद्दीत हुतामाकी कंपनीजवळ वळणावर ट्रक उलटला

### कोळसा आणि ऑईल रस्त्यावर पसरला, चालक किरकोळ जखमी

**दैनिक युवक आधार**
**खालापूर तालुका प्रतिनिधी - संतोष शेवाळे**

पेण-खोपोली मार्गावर आज पहाटे भीषण अपघात झाला. खोपोलीच्या दिशेने जात असलेला दहा चाकी अवजड ट्रक शिरवली हद्दीतील हुतामाकी कंपनीजवळील वळणावर पलटी झाला. अपघातानंतर ट्रकमधील दगडी कोळसा रस्त्यावर पसरला असून गाडीतील ऑईल वाहून गेल्याने परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

सुदैवाने या अपघातात जीवितहानी झाली नाही मात्र चालक अशोक राठोड (गाडी क्रमांक MH CG 5941) यांना किरकोळ दुखापत झाली आहे. सदर ट्रक वडखळ येथील JSW कंपनीतून पुण्याकडे जात असताना ही घटना घडली.




अपघाताच्या ठिकाणी वळण तीव्र असल्याने आणि गाडीत कोळशाचे प्रमाण जास्त असल्यामुळे नियंत्रण सुटल्याने ही दुर्घटना झाल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे.

अपघातानंतर काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेऊन चालकास बाहेर काढले आणि रस्त्यावरील वाहतूक सुरळीत करण्यात मदत केली आहे.

## निफाड तालुक्यातील धारणगाव वीर येथील मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या वृद्धाचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**

**विंचूर :-** धारणगाव वीर येथे दि.१८ ऑक्टो.२०२५ रोजी झालेल्या मारहाणीत गंभीर दुखापत झालेले सुकदेव लक्ष्मण सानप, वय ८२ यांचा उपचारादरम्यान दुर्दैवी मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे.

यापूर्वी सिताबाई नवनाथ सानप रा.धारणगाव वीर यांनी दिलेल्या फिर्यादीत, दि.१७ ऑक्टो रोजी फिर्यादी व फिर्यादीचे पती दिवाळीचा किराणा सामान घेऊन धारणगाव वरून घराकडे जात असताना संशयीत कृष्णा गंभीरे



याने त्यांच्या मोटारसायकलला लाथ मारली. त्यामुळे फिर्यादी व पती दोघे ही खाली पडले असता संशयीत तेथुन पळुन गेला. त्यानंतर दि.१८ ऑक्टो रोजी संशयीत कृष्णा हा फिर्यादी सानप यांच्या घरासमोरुन जात असतांना पाठीमागून त्याचा कामगार जेसीबी घेऊन जात असताना फिर्यादीचे सासरे सुकदेव लक्ष्मण सानप यांनी कृष्णा यांस आदल्या दिवशीच्या भांडणाचा जाब विचारला असता, कृष्णा याने जेसीबीत ठेवलेल्या लोखंडी रॉडने सुकदेव सानप यांच्या डोक्यावर, हातावर, पायावर मारहाण केली. त्यामुळे सुकदेव सानप हे खाली पडले व त्यांच्या डोक्यातुन रक्त येऊ लागले. फिर्यादीचे पती सोडवण्यासाठी गेले असता आरोपीने त्यांनाही धक्काबुक्की केली व त्याने फिर्यादीच्या कुटुंबाला मारहाण करण्यासाठी साहेबराव चिंधु गंभीरे, राजेंद्र चिंधु गंभीरे, निलेश राजेंद्र गंभीरे, बाजीराव चिंधु गंभीरे ,काशिनाथ चिंधु गंभीरे यांना बोलावून फिर्यादीचे सासरे व पती यांना पुन्हा मारहाण केली. फिर्यादी स्वतः भांडण सोडवण्यासाठी गेले असता, त्यांनाही मारहाण करण्यात आली व तुम्ही आमच्या जर नादी लागले तर संपवून टाकू असा दम दिला अशी फिर्याद दिली. त्यांचे फिर्यादीवरून संशयितांच्या विरोधात लासलगाव पोलिस ठाण्यात भा.न्या.सं च्या कलम ११८(२), ११८(१), ३५१(२), ३५१(३), १८९(२), १९०(१), १९१(२), १९१(३) महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे ३७(१), ३७(३), १३५ अन्वये गुन्हा दाखल होऊन आरोपीतांना पोलीसांकडून अटक करण्यात आली होती. आरोपींची रवानगी मध्यवर्ती कारागृहात करण्यात आली होती. यातील जखमी सुखदेव लक्ष्मण सानप हे दि.१८ ऑक्टो.पासून वसंतराव पवार मेडिकल कॉलेज नाशिक येथे उपचार घेत होते. त्यांचे प्रकृतीत सुधारणा झाली नाही. त्यांचा दि.८ नोव्हें रोजी रात्री २ वाजता दुर्दैवी मृत्यू झाला. त्यामुळे सदर आरोपींच्या विरोधात वाढीव १०३ हे कलम लावण्यात आले आहे. याप्रकरणी अधिक तपास स.पो.नि. भास्करराव शिंदे हे करीत आहेत.

# नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक-२०२५ काय करावे व काय करु नये; मार्गदर्शक सूचना जारी

**मा.राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्याकडील दि.०४ नोव्हेंबर २०२५ च्या आदेशान्वये ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ आणि कुळगाव-बदलापूर या नगरपरिषदांच्या सदस्य व अध्यक्ष पदांसाठी सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम-२०२५ जाहीर करण्यात आला असून या कालावधीत काय करावे व काय करु नये याबाबतची मार्गदर्शक सूचना जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी जारी केली आहे.काय आहेत मार्गदर्शक सूचना जाणून घेवू या लेखातून...काय करावे व काय करू नये**

**काय करावे:-**

चालू असलेले कार्यक्रम/योजना पुढे सुरु ठेवता येतील. ज्याविषयी शंका निर्माण होईल अशा बाबींच्या संबंधात, राज्य निवडणूक आयोग/महानगरपालिका आयुक्त/ जिल्हाधिकारी यांच्याकडून स्पष्टीकरण/मान्यता प्राप्त करण्यात यावी. पूर, अवर्षण, साथीचे रोग किंवा अन्य नैसर्गिक आपत्ती यामुळे बाधित झालेल्या क्षेत्रातील जनतेसाठी साह्यकारी व पुनर्वसनाच्या उपाययोजना चालू करता येतील व या संदर्भात चालू असलेल्या योजना पुढे सुरु ठेवता येतील. मरणासन्न किंवा गंभीररित्या आजारी असलेल्या व्यक्तींना रोख रक्कम किंवा वैद्यकीय सवलती देण्याचे समूचित मान्यतेने पुढे चालू ठेवता येईल. मैदानासारख्या सार्वजनिक जागा सर्व पक्षांना/ निवडणुकीत उभे असलेल्या उमेदवारांना निवडणूक सभा घेण्यासाठी निःपक्षपातीपणे उपलब्ध करुन दिल्या पाहिजे. त्याचप्रमाणे सर्व पक्षांना/ निवडणुकीस उभे असलेल्या उमेदवारांना हेलिपॅडच्या वापर निःपक्षपातीपणे उपलब्ध करुन दिला पाहिजे. विश्रामगृहे, डाकबंगले व इतर शासकीय निवासस्थाने वगैरे बाबतीत निवडणूक आयोगाने व त्या अनुषंगाने शासनाने काढलेल्या आदेशास संपूर्णतः अधीन राहून सर्व राजकीय पक्षांना व निवडणुकीस उभे असलेल्या सर्व उमेदवारांना समानतेच्या तत्त्वावर उपलब्ध करुन देता येणे अनुज्ञेय असल्यास त्याप्रमाणे देण्यात यावेत. इतर राजकीय पक्ष किंवा उमेदवार यांच्यावर करण्यात देणारी टीका ही त्यांची धोरणे, कार्यक्रम, पूर्वीची कामगिरी, पार पडलेली कामे, केवळ या बाबींशी संबंधित असावी. शांततामय व उपद्रवरहित गृहस्थ जीवन जगण्याच्या प्रत्येक व्यक्तीच्या अधिकाराचे पूर्णपणे जतन करण्यात यावे. प्रस्तावित सभेची जागा व वेळ याविषयी स्थानिक पोलीस प्राधिकाऱ्यांना पूर्ण माहिती देण्यात यावी आणि त्यासाठी आवश्यक त्या सर्व परवानग्या मिळविण्यात याव्यात. प्रस्तावित सभेच्या जागी निर्बंधात्मक व प्रतिबंधक आदेश जारी केलेले असल्यास त्यांचे पूर्णपणे पालन करण्यात यावे. आवश्यक असल्यास त्याबाबत सवलत मिळण्याविषयी अर्ज केले पाहिजेत व वेळीच अशी सवलत मिळविली पाहिजे. प्रस्तावित सभेसाठी ध्वनिक्षेपक (Loudspeaker) किंवा कोणत्याही इतर अशा सवलतीचा वापर करण्यासाठी योग्य परवानगी मिळविली पाहिजे. सभेमध्ये अडथळे आणणाऱ्या किंवा अव्यवस्था निर्माण करणाऱ्या व्यक्तींना प्रतिबंध करण्यासाठी पोलिसांचे सहाय्य मिळविण्यात यावे. कोणत्याही मिरवणुकीची प्रारंभीची वेळ व जागा, मिरवणूक ज्या मार्गाने जाईल तो मार्ग व मिरवणुकीची अखेर होईल अशी वेळ व स्थान ही बाब आगाऊ स्वरुपात निश्चितपणे ठरविण्यात यावी व पोलीस प्राधिकाऱ्यांकडून त्यासाठी आगाऊ परवानगी घेण्यात यावी. मिरवणूक ज्या वस्तीमधून जात असेल त्या वस्त्यांबाबत कोणतेही निर्बंधात्मक आदेश जारी केलेले असल्यास त्या विषयी खात्री करुन त्याचे पूर्णपणे अनुपालन करण्यात यावे. त्याचप्रमाणे सर्व वाहतूक नियमांचे व अन्य निर्बंधांचे अनुपालन करण्यात यावे. मिरवणुकीमुळे वाहतुकीत कोणताही अडथळा निर्माण होऊ देऊ नये. ज्यांचा क्षेपके किंवा हत्यारे म्हणून गैरवापर होऊ शकेल अशा कोणत्याही वस्तू मिरवणुकीत सहभागी असलेल्या व्यक्तींनी बाळगू नयेत. मतदानाचे काम शांतता व सुव्यवस्थेने पार पडावे यासाठी सर्वतोपरी सर्व निवडणूक अधिकाऱ्यांना सहकार्य देण्यात यावे. उमेदवार व त्याच्या अधिकृत कार्यकत्यांनी विहित परवानगी घेऊन योग्य असे बिल्ले व ओळखपत्रे, निवडणूक प्रशासनाकडून मिळवावीत व ती निवडणुकीचे काम करणाऱ्या व्यक्तींनी ती दर्शनी भागावर लावावीत. मतदारांना देण्यात येणाऱ्या ओळखचिठ्ठया साध्या (पांढऱ्या कागदावर देण्यात येतील य त्यावर कोणतेही चिन्ह, उमेदवाराचे किंवा पक्षाचे नाव यांचा निर्देश असणार नाही.




मतदानाच्या दिवशी वाहनांच्या वापरावरील निर्बंधांचे पूर्णपणे पालन करण्यात यावे. राज्य निवडणूक आयोगाचे, महानगरपालिका आयुक्त यांचे अथवा जिल्हाधिकाऱ्यांचे किंवा त्यांनी प्रधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने दिलेले वैध प्राधिकारपत्र असल्याखेरीज कोणत्याही व्यक्तीस कोणत्याहीवेळी मतदान कक्षात प्रवेश करता येणार नाही. वरच्या दर्जाच्या कोणत्याही व्यक्तींना (उदा. मुख्यमंत्री, मंत्री, राज्यमंत्री, संसद सदस्य, विधानसभा सदस्य, विधानपरिषद सदस्य) यांनाही यातून सूट देण्यात आलेली नाही. निवडणूक पार पाडण्याच्या संबंधातील कोणतीही तक्रार किंवा समस्या, निवडणूक निर्णय अधिकारी/क्षेत्र/प्रभाग दंडाधिकारी यांच्या किंवा राज्य निवडणूक आयोग यांनी नियुक्त केलेल्या निरीक्षकांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी. राज्य निवडणूक आयोग/ आयुक्त, महानगरपालिका/ जिल्हाधिकारी/ निवडणूक निर्णय अधिकारी यांचे निवडणुकीच्या विविध पैलूंच्या संबंधातील सर्व बाबींविषयीचे निर्देश/ आदेश/अनुदेश यांचे पालन करण्यात यावे.

**काय करु नये**


शासकीय वाहने किंवा कर्मचारी वर्ग किंवा यंत्रणा यांचा निवडणूक प्रचारविषयक कामासाठी वापर करण्यात येऊ नये. शासकीय वाहनात पुढील कार्यालयाच्या वाहनाचा समावेश असेल:- केंद्र शासन, राज्य शासन, केंद्र व राज्य शासनाचे सार्वजनिक उपक्रम, मंडळे, महामंडळे, केंद्र शासन व राज्य शासनाच्या संयुक्त क्षेत्रातील उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्था, महानगरपालिका, नगर परिषदा/नगर पंचायती, पणन मंडळ (कोणत्याही नावाचे), सहकारी संस्था, जिल्हा परिषदा/ पंचायत समित्या/ग्रामपंचायती, ज्यामध्ये सार्वजनिक निधी मग तो एकूण निधीच्या हिश्यातील कितीही अल्पांशाने असो गुंतवण्यात आला आहे अशी कोणतीही संस्था व संरक्षण मंत्रालय, गृह मंत्रालय, राज्य शासन, केंद्रीय पोलीस संघटना इत्यादीच्या मालकीची असलेली पुढील वाहने-मालमोटारी, लॉरी, टेंपो, जीपगाड्या, मोटारगाड्या, ऑटोरिक्षा, बसगाड्या, विमाने, हेलिकॉप्टर, जहाजे, बोटी, हॉवर क्रॉफ्ट व इतर सर्व वाहने. सत्तेमध्ये असलेला पक्ष/शासन यांनी साध्य केलेल्या उद्दीष्टांबाबत सरकारी कोषागाराच्या खर्चाने कोणतीही जाहिरात देऊ नये. कोणत्याही वित्तीय अनुदानाची घोषणा करणे, कोनशिला बसविणे, नवीन रस्ते इ. बांधण्याचे वचन देणे इत्यादी गोष्टी करु नयेत. शासन/सार्वजनिक उपक्रम यांच्या सेवेत कोणत्याही तदर्थ (Ad hoc) नियुक्त्या करु नयेत. मंत्री (राज्यमंत्री व उपमंत्रीसहित) हे उमेदवार असल्याखेरीज किंवा प्राधिकृत प्रतिनिधी असल्याखेरीज किंवा मतदानासाठी मतदार या नात्याने असेल त्याखेरीज मतदान कक्षामध्ये किंवा मतमोजणीच्या जागी प्रवेश करणार नाहीत. निवडणूक मोहिम/प्रचार यांच्या जोडीने कोणतेही सरकारी कान पार पाडण्यात येऊ नये. मतदारास आर्थिक किंवा अन्य प्रकारचे कोणतेही प्रलोभन दाखविण्यात येऊ नये. मतदाराच्या जातीय व धार्मिक भावनांना आवाहन करण्यात येऊ नये. विभिन्न जाती, जमाती यांच्यातील किंवा धार्मिक किंवा भाषिक गटातील मतभेद ज्यामुळे अधिक तीव्र होतील किंवा परस्परातील वैमनस्य वाढेल किंवा त्यांच्यात तणाव निर्माण होईल अशी कोणतीही कृती करण्याचा प्रयत्न करण्यात येऊ नये. इतर पक्षांचे कोणतेही नेते किंवा कार्यकर्ते यांच्या सार्वजनिक कार्याशी संबंधित नसेल अशा त्यांच्या खाजगी जीवनातील कोणत्याही पैलूवर टीका करण्याची परवानगी देण्यात येऊ नये. ज्यांचा खरेखोटेपणा पडताळून पाहिलेला नाही असे आरोप ठेवून किंवा त्यास विकृत स्वरुप देऊन इतर पक्ष किंवा त्यांचे कार्यकर्ते यांच्यावर टीका करण्यात येऊ नये. निवडणूक प्रचार तसेच भाषणे, निवडणूक प्रचाराचे फलक, संगीत इत्यादी साठी कोणत्याही प्रार्थनास्थळांचा वापर करण्यात येऊ नये. लाच देणे, आवजवी प्रभाव टाकणे, मतदारांना धाकदपटशा दाखविणे, खोट्या नावाने मतदान करणे, मतदारांना मतदान कक्षापर्यंत पोहोचविणे व तेथून परत नेणे यासारख्या भ्रष्ट प्रथा किंवा निवडणूक विषयक अपराध करण्यास प्रतिबंध आहेत. व्यक्तींची मते किंवा कृत्ये याविरुध्द निषेध व्यक्त करण्यासाठी त्यांच्या घरासमोर निदर्शने किंवा धरणे धरण्यात येऊ नये. कोणत्याही व्यक्तीला, अन्य कोणत्याही व्यक्तीची जमीन, इमारत आवारभिंत इत्यादींचा वापर त्यांच्या मालकांच्या परवानगीखेरीज करणे, ध्वजदंड उभारणे, कापडी फलक लावणे, नोटीशी चिकटविणे किंवा घोषणा लिहिणे इत्यादी करता येणार नाही. यामध्ये शासकीय, सार्वजनिक व खाजगी जागांचा समावेश असेल. इतर राजकीय पक्षांच्या किंवा उमेदवारांच्या सार्वजनिक सभांमध्ये किंवा मिरवणुकीत कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण करण्यात येऊ नये. एका पक्षाची जेथे सभा चालू असेल अशा जागी दुसऱ्या पक्षाद्वारे मिरवणूक काढण्यात येऊ नये. दुसऱ्या पक्षांनी किंवा उमेदवारांनी लावलेली प्रचारपत्रके, भित्तीपत्रके काढून टाकण्यात येऊ नयेत. मात्र याबाबत काही आक्षेप असल्यास पोलिसांच्या किंवा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या निदर्शनास आणावे. मतदानाच्या दिवशी ओळखचिठ्ठया वितरीत करण्याच्या जागी किंवा मतदान कक्षाजवळ प्रचारपत्रके, पक्षांचे ध्वज, चिन्हे किंवा इतर प्रचार साहित्य यांचे प्रदर्शन करु नये. ध्वनिक्षेपकांचा मग ते एकाच जागी लावलेले असोत किंवा फिरत्या वाहनांवर बसविलेले असोत, सकाळी ६.०० वाजण्यापूर्वी किंवा रात्री १०.०० वाजल्यानंतर आणि संबंधित प्राधिकाऱ्यांची लेखी पूर्वपरवानगी घेतलेली असल्याखेरीज वापर करु नये. तसेच याबाबत असलेले The Noise Pollution (Regulation and Control) Rules, २०००ची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच संबंधित प्राधिकाऱ्यांची लेखी पूर्वपरवानगी असल्याखेरीज सार्वजनिक सभेच्या जागी किंवा मिरवणुकीत किंवा प्रचारफेरीत ध्वनिक्षेपकाचा वापर करु नये. अशा सभा/ प्रचारफेरी रात्री १०.०० वाजल्यानंतर चालू ठेवण्याची परवानगी देण्यात येणार नाही. याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन व्हावे तसेच घालून दिलेल्या अटींचे पालन करावे. याखेरीज, ती स्थानिक कायदे, त्या क्षेत्रातील सुरक्षिततेच्या आवश्यकतेचा स्थानिक दृष्टीकोन आणि हवामान, सणासुदीचे दिवस, परिक्षेचा काळ यांच्या अधीनतेने असतील. निवडणुकीच्या काळात कोणत्याही प्रकारच्या पैशाचे, मद्याचे, वस्तूंचे वाटप करण्यात येऊ नये.

**- मनोज सुमन शिवाजी सानप**

# 'राउडी राठोड २' चित्रपटाच्या सीक्वेलमधून अक्षय कुमार बाहेर ?

बॉलिवूड अभिनेता अक्षय कुमारचा २०१२मधील ॲक्शन कॉमेडी चित्रपट 'राउडी राठोड' हा खूप गाजला होता. या चित्रपटाचा आता सीक्वेल बनवण्याची योजना निर्माते संजय लीला भन्साळी आखत आहे. अक्षय कुमारनं 'राउडी राठोड'मध्ये विक्रांत सिंह राठोडची भूमिका केली होती. आता 'राउडी राठोड २'मध्ये प्रेक्षकांना विक्रांत सिंह राठोड म्हणजेच अक्षय कुमार पाहायला मिळणार नाही. मीडिया रिपोर्टनुसार या चित्रपटातून अक्षय कुमारचा पत्ता कट झाला आहे. याबद्दल अधिकृत घोषणा करण्यात आली नाही. मात्र काही दिवसात याबद्दल अपडेट येऊ शकते. आता अक्षय कुमारची जागा कोण घेणार, याबद्दलही माहिती सध्या समोर आलेली नाही.

मिळालेल्या माहितीनुसार भन्साळी स्टुडिओ 'राउडी राठोड २'साठी काही मोठे पाऊल उचलणार आहेत. ते चित्रपटाला फ्रँचायझीमध्ये रूपांतरित करू शकतात, अशाही माहिती आता समोर येत आहे. सध्या भन्साळी प्रॉडक्शन 'राउडी राठोड २'सह अनेक वेगवेगळ्या प्रोजेक्ट्सवर काम करत आहेत. एका रिपोर्टनुसार 'राउडी राठोड २'मधील स्टारकास्ट निश्चित झालेली नाही. या चित्रपटावर सध्या काम सुरू आहे. तसेच सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार या चित्रपटामध्ये पॅन-इंडिया स्टार मुख्य पोलिसांच्या भूमिकेत दिसणार असल्याची शक्यता आहे. या चित्रपटासाठी निर्माते एका मोठ्या पॅन-इंडिया स्टारला कास्ट करण्याचा विचार करत आहेत.



अक्षय कुमारचं वर्कफ्रंट : दरम्यान 'राउडी

# जागतिक रंगभूमी दिनी सुरू होणार कोल्हापूरचं 'केशवराव भोसले' नाट्यगृह, प्रशासनाला विश्वास

**कोल्हापूर :** कोल्हापूरचा सांस्कृतिक वारसा असलेल्या संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृहाच्या पुनर्बांधणीची प्रक्रिया अद्यापही संथ गतीनंच सुरू आहे. ८ ऑगस्ट २०२४ रोजी लागलेल्या भीषण आगीत हे ऐतिहासिक नाट्यगृह पूर्णपणे जळून खाक झालं होतं. त्यानंतर राज्य शासनानं २५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला होता. यानंतर नोव्हेंबर २०२४ पासून पहिल्या टप्प्यातील कामास सुरुवातदेखील झाली होती. मात्र, या पहिल्या टप्प्यातील छताचं काम अजूनही अपूर्ण आहे आणि फक्त ग्राऊटिंगचं काम पूर्ण झालं आहे. त्यामुळे दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या टप्प्याला गती मिळायला उशीर होत आहे. अशा स्थितीत पुन्हा नाटकांचे प्रयोग सुरू होण्यासाठी किमान एक वर्ष लागू शकते, असा अंदाज आहे. त्यामुळे या रखडलेल्या कामावरून रंगकर्मी आणि नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.





याच पार्श्वभूमीवर खासदार शाहू छत्रपती महाराज आणि आमदार राजेश क्षीरसागर यांनी नुकत्याच झालेल्या बैठकीत कामाच्या संथ गतीबाबत अधिकाऱ्यांची चांगलीच झाडाझडती घेतली. काम जलदगतीनं करण्यासंबंधी कडक सूचना ठेकेदाराला देण्यात आल्या. प्रशासनानं २७ मार्च २०२६ रोजी जागतिक रंगभूमी दिनी नाट्यगृह सुरू करण्याचा विश्वास व्यक्त केला आहे. मात्र, रंगकर्मींकडून गुणवत्तेच्या, वेळेच्या आणि समन्वयाच्या मुद्द्यांवर सतत प्रश्न उपस्थित होत आहेत.

या बैठकीवेळी कोल्हापूर महापालिकेच्या प्रशासक के. मंजूलक्ष्मी, प्रमुख अधिकारी, ठेकेदार तसेच रंगकर्मी मोठ्या संख्येनं उपस्थित होते. बैठकीत कलाकारांनी कामाच्या दर्जाबाबत विविध मुद्दे मांडले आणि काही तांत्रिक सुधारणादेखील सुचवल्या.

**जागतिक रंगभूमी दिनी नाट्यगृह पुन्हा खुलं होणार :** बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना खासदार शाहू महाराज छत्रपती म्हणाले की, "केशवराव भोसले नाट्यगृहाच्या पुनर्बांधणीतील कामाची पाहणी केली. सध्या काम समाधानकारक गतीनं सुरू आहे. महापालिकेनं आश्वासन दिलं आहे की, २७ मार्च म्हणजेच जागतिक रंगभूमी दिनापर्यंत काम पूर्ण करून नाट्यगृह कलाकार आणि जनतेसाठी खुलं करण्यात येईल. शासनाकडून निधीअभावी काम अडणार नाही."

**काम वेळेत पूर्ण करण्याचे आदेश :** यावेळी आमदार राजेश क्षीरसागर यांनी सांगितलं की, "या प्रकल्पाचं काम चार टप्प्यांत सुरु आहे. पहिल्या दोन टप्प्यांत काही प्रमाणात विलंब झाला असला तरी तिसरा आणि चौथा टप्पा वेळेत पूर्ण करण्याचे आदेश ठेकेदाराला देण्यात आले आहेत. फेब्रुवारी अखेरपर्यंत सर्व नागरी बांधकाम पूर्ण करून २७ मार्चला नाट्यगृहाचं उद्घाटन व्हावं, ही आमची भूमिका आहे." ते पुढे म्हणाले की, "खासदार शाहू महाराजांच्या अध्यक्षतेखाली या कामाच्या प्रगतीवर सातत्यानं लक्ष ठेवलं जात आहे. रंगकर्मी, एनजीओ आणि विविध कृती समित्यांचे प्रतिनिधीही देखरेख करत आहेत."

**'काम दर्जेदार आणि वेळेत पूर्ण व्हावं' :** रंगकर्मी संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृहासंदर्भातील या बैठकीला उपस्थित असलेल्या प्रसिद्ध अभिनेता आनंद काळे यांनी सांगितलं की, "गेल्या काही महिन्यांपासून नाट्यगृहाच्या कामाला वेग नसल्याची आमची चिंता होती. मात्र, आजच्या बैठकीत स्पष्ट चर्चा झाली. आमच्या मागण्या समजून घेतल्या गेल्या आहेत. आम्हाला केवळ एवढंच अपेक्षित आहे की, हे काम दर्जेदार आणि वेळेत पूर्ण व्हावं. प्रशासनानं दिलेली कमिटमेंट पाळली, तर लवकरच रंगमंच कलाकारांसाठी खुला होईल."

**देखरेखीसाठी २४ तास नियंत्रण कक्ष स्थापन :** कोल्हापूर महापालिकेच्या आयुक्त के. मंजूलक्ष्मी यांनी स्पष्ट केलं की, "नाट्यगृहाचं काम चार टप्प्यांत सुरू आहे. पहिला टप्पा २० नोव्हेंबरपर्यंत, तर दुसरा डिसेंबरपर्यंत पूर्ण करण्याचं लक्ष्य दिलं आहे. आजपासूनच केशवराव भोसले नाट्यगृहात एक स्वतंत्र २४ तास कार्यरत असणारं कार्यालय स्थापन करण्यात आलं आहे. याद्वारे कामावर सातत्यानं देखरेख केली जाईल. गोदरेज कंपनी तिसरा आणि चौथा टप्पा हाताळत असून रंगमंचावरील सर्व काम मार्चअखेर पूर्ण होतील."

# यामी गौतम धर - इमरान हाश्मी अभिनीत 'हक'ची पहिल्या दिवशीची कमाई, वाचा सविस्तर...

बॉलिवूड अभिनेत्री यामी गौतम धर आणि इमरान हाश्मी स्टारर 'हक' हा चित्रपट ७ नोव्हेंबर रोजी रुपेरी पडद्यावर प्रदर्शित झाला होता. आता या चित्रपटानं प्रेक्षकांचं मनं जिंकली आहेत. यामी आणि इमरान हे चित्रपट रिलीज झाल्यानंतर एका थिएटरमध्ये गेले होते.

यानंतर एक गोष्ट घडली. सोशल मीडियावर एक व्हिडिओ व्हायरल झाला होता, ज्यामध्ये एक मुस्लिम महिला येऊन रडत अभिनेत्रीला मीठी मारते. ती महिला यामीला सांगते, "मी





खूप आनंदी आहे. हे पाहून मला वाटले की, मी हे बरोबर केले पाहिजे.

" यानंतर यामी तिला म्हणते, "धैर्यवान राहा." ती महिला उत्तर देते, "हे माझ्यासाठी देखील आहे की, मी अशा प्रकारे लढू शकते. मी खूप काही शिकले." आता यामीच्या या व्हिडिओवर अनेकजण आपल्या प्रतिक्रिया देत आहेत. दरम्यान या चित्रपटानं बॉक्स ऑफिसवर आपला एक दिवस पूर्ण केला आहे. 'हक' चित्रपटानं बॉक्स ऑफिसवर किती कमाई केली याबद्दल आम्ही तुम्हाला सांगणार आहोत.

सॅकनिल्कच्या सुरुवातीच्या रिपोर्टनुसार, चित्रपटानं रिलीजच्या पहिल्या दिवशी १.६५ कोटींची कमाई केली होती. हे प्राथमिक आकडे आहेत, यात काही थोडा बदल देखील होऊ शकतो. मात्र या चित्रपटानं अपेक्षांनुसार कमाई केलेली नाही.

आता येणाऱ्या दिवसांमध्ये हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर चांगली कामगिरी करेल अशी आता अपेक्षा केली जात आहे. या चित्रपटाचं यामी गौतम धर आणि इमरान हाश्मी यांनी जोरदार प्रमोशन केलं होतं. दरम्यान या चित्रपटाचं दिग्दर्शन सुपर्ण वर्मा यांनी केलं आहे. याशिवाय या चित्रपटाची कहाणी रेशु नाथ यांनी लिहिली आहे.

# 'असुरवन' चित्रपटाचा टीजर प्रदर्शित

स्वप्नस्वरूप प्रस्तुत, बहुप्रतिक्षित 'असुरवन' या आगामी मराठी चित्रपटाचे मोशन पोस्टर प्रदर्शित होताच या चित्रपटाची सोशल मीडियावर चर्चा सुरू झाली. त्यानंतर नुकताच या चित्रपटाचा चित्तथरारक टीजर प्रदर्शित झाला आहे. 'कांतारा' आणि 'दशावतार' यासारख्या स्थानिक संस्कृतीवर आधारित चित्रपटांप्रमाणेच 'असुरवन' हा महाराष्ट्राच्या मातीत रुजलेला चित्रपट आहे. कमी कालावधीतच 'असुरवन' चित्रपटाने सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. वाघाच्या चित्राने रंगवलेला मुखवटा, अद्भुत जंगल आणि आदिवासी संस्कृतीची सांगड तसेच बॅकग्राउंड संगीतामुळे या सगळ्यातून चित्रपटात नेमकं काय पहायला मिळणार याची उत्कंठा शिगेला पोहोचली आहे.

सचिन आंबात लिखित व दिग्दर्शित 'असुरवन' हा चित्रपट आदिवासी प्राचीन वारली परंपरा आणि रहस्यमय पार्श्वभूमी यांचं मिश्रण आहे. जसा पोस्टरमधील चेहरा प्रेक्षकांना अस्वस्थ करतोय, तसंच टीजर मधील खबर कलली का? हा डायलॉग मात्र त्याचवेळी उत्सुकता देखील निर्माण करतोय. आपल्या भव्य मांडणीने आणि गूढ वातावरणाने टीझर प्रेक्षकांना खिळवून ठेवतो.

स्वप्नस्वरूप प्रस्तुत 'असुरवन' चित्रपटाचे दिग्दर्शक आणि लेखक सचिन आंबात आहेत. तसेच या चित्रपटात विश्वास पाटील, सुरज नेवरेकर, दीप्ती धोत्रे, अनुज ठाकरे, सचिन चांदवडे, विपुल साळुंखे, विनायक चव्हाण, पूजा मौली, मयूरेश जोशी, रोहिणी थोरात, हर्षद वाघमारे, सिद्धेश शिंदे, विशाल साठे, संदीप पाटील, सूरज परब, योगिता पाखरे, योगेश शेडगे, प्रणव दळवी, तनिषा जाधव, निकिता मेस्त्री, व्यंकटेश गावडे,





श्याम सावंत, सनी जाधव, कल्पेश डुकरे, मनोज कदम यांच्या प्रमुख भूमिका आहेत. येत्या 5 डिसेंबर रोजी चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

चित्रपटाचे लेखक-दिग्दर्शक सचिन आंबात चित्रपटाच्या टीजरविषयी म्हणतात, 'असुरवन हा चित्रपट महाराष्ट्राच्या मातीतील परंपरेचे आणि श्रद्धेचे दर्शन आहे. असुरवन महाराष्ट्रातील श्रद्धा, जंगल, डोंगर, गूढता आणि परंपरा यांचं प्रतिबिंब दाखवणार आहे. आमचं उद्दिष्ट हेच होतं की ही माती, हे जंगल, हा रंग आणि ही ऊर्जा पडद्यावर जिवंत करायची. मराठी चित्रपटात असा प्रयत्न कदाचित पहिल्यांदाच झाला असावा. त्यामुळे माझी सर्व रसिक प्रेक्षकांना विनंती आहे की त्यांनी हा चित्रपट ५ डिसेंबरला आपल्या जवळच्या चित्रपटगृहात जाऊन नक्की बघावा'.

# असंभवमध्ये सचित पाटील झळकणार तिहेरी भूमिकेत

मराठी चित्रपटसृष्टीतील एक बहुआयामी, प्रभावी आणि दर्जेदार अभिनेता म्हणून आपली ओळख निर्माण करणारा सचित पाटील आता प्रेक्षकांसाठी एक वेगळा अनुभव घेऊन येत आहे. 'असंभव' या थरारक आणि रहस्यमय चित्रपटातून सचित पाटील पहिल्यांदाच तिहेरी भूमिकेत झळकणार असून निर्माता, दिग्दर्शक आणि अभिनेता या तिन्ही जबाबदाऱ्या तो एकाचवेळी सांभाळत आहे.

'साडे माडे तीन', 'क्षणभर विश्रांती', 'झेंडा', 'अर्जुन',





'क्लासमेट्स', 'फ्रेंड्स' सारख्या चित्रपटांमधून तसेच 'राधा प्रेम रंगी रंगली' आणि 'अबोली' या मालिकांमधून सचितने आपल्या अभिनयाने प्रेक्षकांच्या मनावर खोल ठसा उमटवला आहे. 'साडे माडे तीन' आणि 'क्षणभर विश्रांती' या चित्रपटांचे दिग्दर्शन करून त्याने आपल्या सर्वगुणसंपन्नतेचा ठसा आधीच उमटवला होता. आता 'असंभव'मधून तो एका नव्या रूपात, नव्या जबाबदारीत आणि नव्या आव्हानासह परतला आहे.

काही दिवसांपूर्वी प्रदर्शित झालेल्या 'असंभव'च्या टीझरने प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण केली आहे. रहस्य आणि थरार यांच्या उत्तम मेळ असलेला हा चित्रपट प्रेक्षकांना एक वेगळाच अनुभव देणार असल्याचे दिसत आहे. 'असंभव'चे दिग्दर्शन सचित पाटील यांनी तर सह दिग्दर्शन पुष्कर श्रोत्री यांनी केलं आहे. या चित्रपटात मराठीतील चार नामवंत कलाकार सचित पाटील, मुक्ता बर्वे, प्रिया बापट आणि संदीप कुलकर्णी पहिल्यांदाच एकत्र झळकणार आहेत. या चौघांच्या अभिनयाची जुगलबंदीच या चित्रपटाचे मोठे आकर्षण ठरणार आहे.

'मुंबई पुणे फिल्म्स एंटरटेनमेंट'चे सचित पाटील आणि नितीन प्रकाश वैद्य हे चित्रपटाचे निर्माते असून, एरिकॉन टेलिफिल्म्सच्या शर्मिष्ठा राऊत, तेजस देसाई आणि पी अँड पी एंटरटेनमेंटचे मंगेश परुळेकर व संजय पोतदार हे सहनिर्माते आहेत. रहस्य, भावना आणि नात्यांच्या गाठींच्या थरारात प्रेक्षकांना गुंतवून ठेवणारा 'असंभव' हा चित्रपट २१ नोव्हेंबर रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे.

**मेष** – वेळेबरोबर चालावे लागेल. प्रगतीला चांगला वाव मिळेल.एखादी दिलासादायक घटना घडेल. विक्षिप्त लोकांपासून दूर राहा. वेळेबरोबर चालावे लागेल. प्रगतीला चांगला वाव मिळेल.

**वृषभ** – प्रगतीच्या दृष्टीने पाऊल पुढे टाकाल. शक्यतो वादाच्या मुद्यात अडकू नका. वेळेचा सदुपयोग करावा. तब्येत उत्तम राहील.

**मिथुन** – महत्त्वाचे काम करता येईल. अनावश्यक खरेदी केली जाईल. कला-क्रीडा क्षेत्रात प्रगती होईल. धंदा मिळेल. मन स्थिर ठेवा.





**कर्क** – स्वप्नाळू वृत्तीतून बाहेर या. भाग्याची साथ लाभेल. आर्थिक घडी सुधारेल. कौतुकाची अपेक्षा ठेवू नका. जिद्द उपयोगी पडेल.

**सिंह** – तुमची महत्त्वाकांक्षा वाढेल. धंद्यात फायदा होईल. कठीण काम करून घ्या. वाद घालू नका. अधिकाऱ्यांचा पाठिंबा मिळवाल.

**कन्या** – तुमचे मत व्यक्त करण्याची घाई करू नका. धार्मिक कामात सहभागी होण्याची संधी मिळेल. आपल्या कर्तृत्वाला वाव मिळेल.

**तूळ** – आप्तेष्टांची भेट होईल. समोरील व्यक्तीवर चटकन विश्वास ठेवू नका. व्यावसायिक स्तरावर एखादी सकारात्मक घटना घडेल.

**वृश्चिक** – जोडीदाराचा प्रेमळ सहवास लाभेल. मित्रांसोबत वेळ घालवाल. गरज नसेल तर फार बोलू नका. प्रतिष्ठा सांभाळता येईल.

**धनु** – महत्त्वाचे काम करून घ्या. वरिष्ठ तुमचे मत विचारात घेतील. मानसिक दुर्बलता टाळावी. हितशत्रूंवर लक्ष ठेवावे. धंद्यात जम बसेल.


**मकर** – कोणत्याही गोष्टीची अतिशयोक्ती करू नका. आपली आध्यात्मिक आवड वाढीस लागेल. समोरील संधीचा लाभ घ्यावा.

**कुंभ** – मनासारखी घटना घडेल. तुमच्या बोलण्याचा प्रभाव पडेल. धरसोड वृत्ती ठेवू नका. नवे परिचय होतील. महत्त्वाचे काम करा.

**मीन** – पदाधिकार मिळाल्याने उत्साहित व्हाल. जोडीदाराशी मतभेद टाळा. सामाजिक कामात रमाल.

# खजुराच्या बिया आहेत एनर्जी बूस्टर, जाणून घ्या सेवन करण्याची पद्धत

खजूर खाल्ल्यानंतर त्याच्या बिया निरूपयोगी समजून फेकून देत असाल तर ही बातमी तुमच्यासाठी आहे. साधारणपणे खजूर खाल्ल्याने होणारे फायदे सर्वांना माहिती आहेत. पण खजूर खाल्ल्यानंतर जी बी तुम्ही फेकून देता ती सुद्धा उपयुक्त आहे. बहुगुणी खजुराच्या बिया शरीराच्या अनेक समस्या दूर करू शकतात. आज आपण जाणून घेऊयात खजुराच्या बिया कोणत्या आजारावर उपयुक्त आहेत आणि त्या सेवन करण्याची पद्धत.



खजुराच्या बियांची पावडर पाण्यात किंवा दुधात घालून प्यायल्याने अनेक फायदे होतात. या बियांमध्ये खराब कोलेस्ट्रॉल आणि उच्च रक्तातील साखर नियंत्रित करण्याचा गुणधर्म आहे.

खजुराच्या बियांमध्ये भरपूर फायबर असते. जे पचन संस्था निरोगी ठेवण्यास मदत करते. याचे पावडर स्वरूपात सेवन केल्याने बद्धकोष्ठतेसारख्या समस्यांपासून आराम मिळतो.

हृदयाचे आरोग्य निरोगी ठेवायचे असेल तर खजुराच्या बियांची पावडर उपयुक्त ठरेल. या बिया कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रित ठेवतात. ज्यामुळे हृदयविकाराचा धोका कमी होतो.

रोग प्रतिकारकशक्ती कमी असेल तर खजुराच्या बियांचे सेवन करावे. यामुळे रोगप्रतिकारकशक्ती मजबूत होते.

खजुराच्या बियांची पावडर स्क्रब म्हणून वापरावी. यामुळे डेड स्किन निघून जाईल आणि त्वचा चमकदार बनते.

केसांच्या विविध समस्या असतील तर खजुराच्या बिया उपयुक्त ठरतील. खजुराच्या बियांचे तेल केस मजबूत करण्यासाठी हे वापरता येईल.

**कशी बनवाल पावडर?**

खजुराच्या बिया चांगल्या प्रकारे धुवून त्या उन्हात वाळवाव्यात.

कोरड्या झाल्यानंतर त्यांना हलके भाजून घ्यावे.

भाजल्याने बियांमधील ओलावा पूर्णपणे निघून जाईल.

थंड झाल्यावर या बिया मिक्सरमध्ये बारीक करून त्याची पावडर बनवावी.

# दौलवडगाव पंचायत समिती निवडणुकीत महादेव कोहक यांचा निर्धार ठाम!

**दैनिक युवक आधार**
**आष्टी (प्रतिनिधी):बाळासाहेब रकटाटे**



दौलवडगाव पंचायत समिती गणातून निवडणूक लढवण्यासाठी अनेक इच्छुकांची नावे चर्चेत आहेत. मात्र सध्या जनतेच्या विशेष चर्चेत असलेले नाव म्हणजे युवा नेते महादेव कोहक. सर्वसामान्य माणसात राहून कार्य करणारा, जनतेशी सातत्याने संवाद ठेवणारा आणि लोकांशी मनापासून जोडलेला असा हा युवा नेता म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे. महादेव कोहक यांनी सामाजिक कार्य, शैक्षणिक क्षेत्र, तसेच आरोग्य सेवांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत सर्वांच्या मनात वेगळी छाप निर्माण केली आहे. सतत जनतेच्या अडचणी, समस्या जाणून त्यावर उपाय शोधणारे आणि विकासाच्या वाटेवर ग्रामपंचायत नेण्यासाठी तत्पर असलेले कोहक यांनी पंचायत समिती निवडणुकीत उतरायचा निर्धार केला आहे.स्थानिकांमध्ये त्यांच्या उमेदवारीबाबत मोठी चर्चा असून, त्यांना गावकऱ्यांचा आणि तरुणांचा प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. अनेक प्रतिष्ठित नागरिक आणि कार्यकर्त्यांनीही त्यांच्या उमेदवारीला पाठिंबा दर्शविला आहे.जर पंचायत समिती गणातून महादेव कोहक यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला, तर त्यांचा विजय निश्चित असल्याचे ग्रामस्थांतून व्यक्त केले जात आहे.

# दिव्यांग हक्क मोर्चा संघटनेच्यावतीने शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांना विविध मागण्यांचे निवेदन

**दैनिक युवक आधार**
**सेलू प्रतिनिधी:- महेश राऊत**



सेलू तालुक्यातील ढेंगळी पिंपळगाव येथे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे साहेब अतिवृष्टि पाहाणी दरम्यान आले असता. त्यांना परभणी जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्तिंना ई-रिक्षा वाटप करणे बाबत व विविध मागण्यांचे निवेदन दिव्यांग हक्क मोर्चा संघटनेचे जिल्हाध्यक्ष गुलाबराव खेडेकर यांच्या वतीने देण्यात आले.यावेळी रामेश्वर पौळ,सुभाष जैस्वाल,इंद्रजीत गवारे,अंकुश पांढरे,ओमप्रकाश गात,मोहन साखरे,वसंत गोंडगे,मन्सुर पठाण,दिपक वानरे,अनंता महाजन,गणेश खरवडे,चंद्रशेखर शिंदे,गजानन खेडेकर,कृष्णा बोबडे,लक्ष्मण सपाटे,आदी दिव्यांग हक्क मोर्चा संघटनेचे पदाधिकारी व सेलु तालुक्यातील दिव्यांग बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते..

# खोपोलीत राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेचा जल्लोष

## २४० खेळाडूंचा सहभाग - कोल्हापूर विभाग सांघिक विजेता, पुणे विभाग उपविजेता

**दैनिक युवक आधार**
**खोपोली :वार्ताहर**

खोपोलीतील काशी स्पोर्ट्स सेंटर येथे नुकतीच १७ वर्षाखालील राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धा जल्लोषात पार पडली. राज्यभरातील तब्बल २४० मुलामुलींनी या स्पर्धेत सहभाग घेतला. फ्रीस्टाईल आणि ग्रेको-रोमन पद्धतीच्या विविध वजनी गटांत सामने रंगले.

या भव्य स्पर्धेचे उद्घाटन रायगड जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष परेश ठाकूर यांच्या हस्ते झाले. यावेळी काशी स्पोर्ट्सचे अध्यक्ष विक्रम साबळे, डॉ. समर्थ मनुकर, शिवछत्रपती पुरस्कार विजेते मारुती आडकर, तसेच रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ आणि राज्य क्रीडा मार्गदर्शक निळकंठ आखाडे प्रमुख उपस्थित होते.



कुस्ती क्रीडाप्रकाराला अधिक चालना देण्यासाठी सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन श्री. परेश ठाकूर यांनी दिले. त्यांनी सांगितले की, "खोपोली परिसरात कुस्ती प्रशिक्षण केंद्र उभारण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील. यामुळे नवोदित खेळाडूंना व्यासपीठ व प्रोत्साहन मिळेल."

स्पर्धेचे उत्कृष्ट आयोजन कुस्ती महर्षी भाऊसाहेब कुंभार कुस्ती न्यास आणि काशी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. स्पर्धा प्रमुख राजाराम कुंभार, निरीक्षक संदीप वांजळे व दत्ता माने, तसेच तांत्रिक प्रमुख जगदीश मरागजे यांनी स्पर्धेच्या यशस्वी आयोजनात मोलाचा वाटा उचलला. कार्यक्रमास टाटा स्टील कंपनीचे शशी भूषण, भावेश रावळ, सौरभ शर्मा, तसेच रिन्युसेस कंपनीचे चंद्रकांत मोडक आणि निलेश साळुंखे उपस्थित होते.

कोल्हापूर विभागाच्या मुलींनी ६ सुवर्ण, १ रौप्य, २ कांस्य पदके मिळवत सांघिक विजेतेपद पटकावले, तर मुलांनी ६ सुवर्ण, ३ रौप्य, ७ कांस्य पदकांसह वर्चस्व गाजवले. पुणे विभागाच्या मुलींनी ३ सुवर्ण, ४ रौप्य, १ कांस्य, आणि मुलांनी ४ सुवर्ण, ४ रौप्य, ६ कांस्य पदकांसह सांघिक उपविजेतेपद मिळवले.स्पर्धेच्या आयोजनात कुस्ती महर्षी भाऊसाहेब कुंभार कुस्ती न्यास व काशी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स यांच्या सर्व सदस्यांनी उत्कृष्ट नियोजन केले. हेल्प फाउंडेशनने उत्कृष्ट सुरक्षा व्यवस्था पुरवली, तसेच खेळाडूंसाठी सुसज्ज निवास आणि पौष्टिक भोजनाची उत्तम सोय करण्यात आली. प्रेक्षकांसाठी आकर्षक आसनव्यवस्था, एलईडी स्क्रीनद्वारे थेट प्रक्षेपण आणि यू ट्यूब वर लाईव्ह स्ट्रीमिंगची सुविधाही देण्यात आली.

स्पर्धा आयोजन समितीच्या वतीने कुस्ती क्रीडाप्रकारात आंतरराष्ट्रीय मानांकन प्राप्त करणाऱ्या प्रशिक्षकांचा "महाराष्ट्राचे द्रोणाचार्य" असा विशेष सन्मान करण्यात आला. या मानकरी प्रशिक्षकांमध्ये दादा लवटे, संदीप पाटील, संदीप पठारे, अमोल यादव, नागेश राक्षे, किरण मोरे, संपती येळकर, विजय चव्हाण आणि दिवेश पालांडे यांचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी काशी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, कुस्ती महर्षी भाऊसाहेब कुंभार कुस्ती न्यास, रायगड जिल्हा कुस्तीगीर संघ, सर्व पंच, प्रशिक्षक, आयोजक तसेच रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ आणि राज्य क्रीडा मार्गदर्शक निळकंठ आखाडे यांचे मार्गदर्शन व सहकार्य अत्यंत मोलाचे ठरले.

# तंत्रज्ञानाधारित मानव संसाधन आणि ऑपरेशन्सवर कार्यशाळा

**दैनिक युवक आधार**
**नवी मुंबई वार्ताहर**



भारती विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च, नवी मुंबई आणि इंडियन सोसायटी फॉर ट्रेनिंग अँड डेव्हलपमेंट , नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने "टेक्नॉलॉजी एनेबल्ड ह्युमन रिसोर्सेस आणि ऑपरेशन्स" या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळेचे उद्घाटन महाविद्यालयाच्या संचालिका डॉ. अंजली कळसे यांच्या हस्ते झाले. त्यांनी या नावीन्यपूर्ण उपक्रमाचे कौतुक करत विद्यार्थ्यांना उद्योगातील नव्या तांत्रिक बदलांचा स्वीकार करण्याचे आवाहन केले.

कार्यशाळेत श्री. युवराज ठोंबरे, व्हाइस प्रेसिडेंट, ओनामा ग्रुप, मुंबई आणि बी व्ही आय एम एस आर चे माजी विद्यार्थी, यांनी विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाधारित उद्योग, मानव संसाधन आणि ऑपरेशन्स व्यवस्थापनातील आधुनिक प्रॅक्टिसेस आणि एसएपी क्षेत्रातील करिअर संधी या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले तसेच विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची उत्तरे दिली.

या प्रसंगी डॉ. कुलदीप भालेराव, मुख्य मार्गदर्शक, ह्युमन कॅपिटल क्लब व ऑपरेशन्स क्लब व्ही आय एम एस आर आणि सचिव, आय एस टी डी, नवी मुंबई यांनी डॉ. विलासराव कदम, संचालक, भारती विद्यापीठ नवी मुंबई कॉम्प्लेक्स, डॉ. अंजली कळसे, संचालिका, व्ही आय एम एस आर आणि डॉ. वैशाली पाटील, अध्यक्षा, आय एस टी डी, नवी मुंबई यांच्या मार्गदर्शनाबद्दल आभार व्यक्त केली.

कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यार्थी सदस्य किंजल धुमाळ, रितीशा कारफा, सुहैल चिलवण, महेश्वरी गुरव, पार्थ चव्हाण, कार्तिक घरत, निकिता शिनत्रे, श्रेया वामन आणि सुमित पाटील यांनी विशेष योगदान दिले.ही कार्यशाळा विद्यार्थ्यांना उद्योगजगताशी जोडणारी आणि तंत्रज्ञानावर आधारित नव्या करिअरच्या संधींची दारे उघडणारी ठरली.

# शेतकऱ्यांची थट्टा करणाऱ्या सरकारला निवडणुकीत धडा शिकवा – उद्धव ठाकरे

**दैनिक युवक आधार**
**परतूर -जालना (अशोक ठोके)**



महाराष्ट्रातील भाजपा ने तिघाडी सरकार स्थापन केलेले आहे या तिघाडीने अतिवृष्टी ग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी नुकसान भरपाई देऊ अशी घोषणा केली होती,मात्र सरकारने अजूनही भरपाई दिलेली नाही. तसेच विधानासभा निवडणुकी आधी सातबारा कोरा करू असे आश्वासन दिलेले होते. त्यामुळे आता शेतकरी बांधवांनो आता रडायचं नाही तर सरकारला व शेतकऱ्यांना फसव्या घोषणांचे आश्वासन देणाऱ्या सरकारला रडवायचं हे ध्यानात ठेवा. म्हणून शेतकऱ्यांनी येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत गावोगावी कर्जमुक्ती नाही तर भाजपा युतीला मतदान नाही असे फलक लावावेत असे अवाहन माजी मुख्यमंत्री तथा शिवसेना उबाठा गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना केले,ते पाटोदा (माव) येथे उबाठा जिल्हाप्रमुख महेश नळगे यांनी आयोजित केलेल्या शेतकरी संवाद कार्यक्रमात शेतकऱ्यांना मार्गदर्शन करत होते.

या संवाद दौरा कार्यक्रमासाठी विधानपरिषदेचे विरोधी पक्षानेता अंबादास दानवे, माजी खासदार चंद्रकांत खैरे, परभणीचे खासदार संजय जाधव, उपनेते लक्ष्मण वडले, जिल्हाप्रमुख महेश नळगे, उपजिल्हाप्रमुख माधवराव मामा कदम, जेष्ठ नेते रामेश्वर अण्णा नळगे, अशोक आघाव, रणजीत गजमल, तालुका प्रमुख भारत पंडित, प्रदीप बोराडे, गणेश दराडे, गणेश नाना नळगे, रामचंद्र काळे, विठ्ठल वटाणे, बिजय बोरुडे, महादेव बोरुडे, मधुकर पाईकराव, आबा कदम, दत्ता सुरुंग, राहुल कदम, संदीप पाचारे, दिपक काळे, इब्राहिम कायमखानी आदी प्रमुख उपस्थिती होते.तसेच अतिवृष्टीग्रस्त शेतकरी, महिला व उबाठा पक्षाचे सर्व कार्यकर्ते उपस्थिती होते.

पुढे बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, या वर्षी मे महिन्यापासून पाऊस सुरु झालेला आहे. गेली ७ महिन्यापासून पाऊस थांबायचं नाव घेत नाही. त्यामुळे परतूर तालुक्यातील शेतकऱ्यांचे सर्व पिके वाया गेलेली आहेत. मात्र सरकार व प्रशासन अजूनही साधे पंचनामे करत नाहीत. त्यामुळे हे सरकार अतिवृष्टीचे घोषित केलेले अनुदान कधी देणार आहे असा सवाल सरकारला ठाकरे यांनी केला. त्याच बरोबर मी परत तुमच्या भेटीला येईल तोपर्यंत तुम्ही प्रशासन यांना पंचनामे करण्यास जेरीस आना व पंचनामे करून घ्या मी येईल तेव्हा सरकार व प्रशासनाचा पंचनामा मला दाखवा,असे आवाहन ठाकरे यांनी शेतकऱ्यांना केले.

# आष्टीत पत्रकार गहिनीनाथ पाचबैल आणि प्रा. निसार शेख यांचा सत्कार

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी : मारुती सत्रे**



आष्टी येथील शासकीय विश्रामगृहात शनिवारी झुंजार नेताचे झुंजार पत्रकार तथा मागिल अनेक वर्षापासून पत्रकार क्षेत्रात नावलौकीक मिळवलेले गहिनीनाथ पाचबैल यांची मराठी पत्रकार परिषद संलग्न आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या सचिवपदी नुकतीच निवड झाल्याबद्दल, तसेच मागिल २५ वर्षापासून कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय धानोरा येथे ज्ञानदानाचे पवित्र कार्य करत असलेले प्राध्यापक तथा पत्रकार निसार शेख यांना लोकशक्ती महाराष्ट्र गौरव 'आदर्श प्राध्यापक' पुरस्कार मिळाल्याबद्दल दोन्ही पत्रकार बंधूंचा सत्कार दैनिक झुंजार नेताचे संपादक अजित वरपे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी मराठी पत्रकार परिषद बीड जिल्हा उपाध्यक्ष तथा आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, दैनिक झुंजार नेताचे व्यवस्थापक राहुल जामकर, पत्रकार दिगंबर बोडखे, माजी सरपंच विठ्ठल राख, आदर्श शिक्षक कल्याण वाल्हेकर, पत्रकार राजेंद्र लाड, संतोष नागरगोजे, सचिन पवार, सिराज सय्यद आदी यावेळी उपस्थित होते.

# वंदे मातरम्' हे भारताचे राष्ट्रीय गीत , बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी १८७६ मध्ये त्यांच्या 'आनंदमठ' या कादंबरीत लिहिले गीत

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर** : 'वंदे मातरम्' हे भारताचे राष्ट्रीय गीत असून, बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी १८७६ मध्ये त्यांच्या 'आनंदमठ' या कादंबरीत हे गीत लिहिले. हे गीत १८८२ मध्ये प्रकाशित झाले आणि १९५० मध्ये भारताच्या संविधान सभेने त्याला राष्ट्रीय गीत म्हणून मान्यता दिली. 'वंदे मातरम्' हे स्वातंत्र्यलढ्यातील प्रेरणास्थान ठरले असून आजही देशभक्तीचे प्रतीक मानले जाते.



आज या राष्ट्रीय गीताच्या १५० वर्षपूर्तीनिमित्त भारतीय जनता पक्ष, उत्तर रायगड जिल्ह्याच्या वतीने पनवेल येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात मराठी सिनेसृष्टीतील दिग्गज अभिनेते, रंगभूमीवरील मातब्बर कलाकार आणि हिंदुत्व या विषयावर आपल्या जाज्वल्य व्याख्यानांतून लाखो लोकांना प्रेरणा देणारे सुप्रसिद्ध व्याख्याते श्री शरद पोंछे यांचे पनवेल नगरीत स्वागत करण्यात आले. त्यांच्या अमोघ वाणीतील प्रभावी व्याख्यान ऐकण्याचे सौभाग्य पनवेलकरांना लाभले.

कोलकाता येथे १८९६ साली झालेल्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात 'वंदे मातरम्' हे प्रेरणागीत प्रथम रवींद्रनाथ टागोर यांनी गायले होते. देशभक्तीची भावना जागवणारे हे गीत आजही भारतीयांच्या हृदयात अढळ स्थान राखून आहे.आपल्या व्याख्यानात श्री शरद पोंछे म्हणाले, "'वंदे मातरम्' म्हणणं सोपं आहे, पण त्याचा अर्थ जगणं म्हणजे प्रामाणिक राहणं, देशासाठी काहीतरी करणं, आणि प्रत्येक क्षणी मातृभूमीचा सन्मान राखणं हा आहे."

ते पुढे म्हणाले की, या गीताला १५० वर्ष पूर्ण होत असताना, त्याचा मान, सन्मान आणि पावित्र्य जपणे हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे.कार्यक्रमाच्या वेळी व्यासपीठावर महाराष्ट्र राज्याचे वनमंत्री सन्माननीय नामदार श्री गणेशजी नाईक, पनवेलचे कार्यसम्राट आमदार सन्माननीय श्री प्रशांत दादा ठाकूर, भारतीय जनता पक्ष उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष सन्माननीय श्री अविनाशजी कोळी, जिल्हा सरचिटणीस तथा मा नगरसेवक नितीन पाटील आणि इतर मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता संपूर्ण 'वंदे मातरम्' चे गायन करून करण्यात आली.

# कोरम मॉलमध्ये होणार चौथा पिनॅकल FIDE रेटेड रॅपिड चेस टूर्नामेंट

**दैनिक युवक आधार**

**ठाणे,वार्ताहर** : ठाणे जिल्हा बुद्धिबळ संघटना (TDCA) यांच्या सहकार्याने कोरम मॉलमध्ये 9 नोव्हेंबर 2025 रोजी "चौथा पिनॅकल FIDE रेटेड रॅपिड चेस टूर्नामेंट" आयोजित केला जाणार आहे. या स्पर्धेचे आयोजन पिनॅकल चेस इव्हेंट्स यांनी केले आहे. तीन यशस्वी आवृत्त्यांनंतर ही अत्यंत अपेक्षित स्पर्धा पुन्हा एकदा ठाण्यात परतत आहे — जिथे वेग, अचूकता आणि रणनीती यांचा रोमांचक संगम पाहायला मिळणार आहे.

या स्पर्धेला ऑल इंडिया चेस फेडरेशन (AICF) आणि FIDE यांची मान्यता मिळाली आहे. तसेच ठाणे जिल्हा बुद्धिबळ संघटना आणि महाराष्ट्र बुद्धिबळ संघटना यांच्या रेटिंगअंतर्गत या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे — ज्यामुळे ती भारतातील जलद गतीने वाढणाऱ्या बुद्धिबळ सर्किटमधील एक महत्त्वाची स्पर्धा ठरली आहे.महाराष्ट्रासह देशाच्या विविध भागांतील खेळाडू या स्पर्धेत सहभागी होणार असून, यात तरुण आशादायी खेळाडूंपासून ते अनुभवी मास्टर्सपर्यंत सर्वांचा समावेश असेल. प्रत्येक चाल वेळेच्या काटेकोर मर्यादेत खेळली जाणार असून, बुद्धिबळातील बुद्धिमत्ता, संयम आणि वेग यांचा सर्वोत्तम संगम या स्पर्धेत पाहायला मिळेल.

समावेशकतेच्या भावनेनुसार, या स्पर्धेत शारीरिकदृष्ट्या दिव्यांग आणि दृष्टिहीन खेळाडूंसाठीही विशेष श्रेणी आणि पुरस्कारांची व्यवस्था करण्यात आली आहे, ज्यामुळे बुद्धिबळ हा सर्वांसाठीचा खेळ म्हणून अधिक बळकट होईल.

कोरम मॉलला भेट देणाऱ्या प्रेक्षकांना या दिवशी रोमांचक सामन्यांचा आणि प्रेरणादायी कथा-पटांचा अनुभव घेता येईल. बुद्धिबळाच्या पटावर रणनीती आणि आवड यांचा संगम घडण्यासाठी सर्व तयारी पूर्ण झाली आहे. चला, खेळाला सुरुवात करूया!

स्थळ: मेन एट्रियम, कोरम मॉल

दिनांक: रविवार, 9 नोव्हेंबर 2025 | सकाळी 8:30 पासून पुढे

बक्षीस निधी: ₹4,00,000 आणि 43 ट्रॉफीज

आयोजक: कोरम मॉल, ठाणे जिल्हा बुद्धिबळ संघटना (TDCA) आणि महाराष्ट्र बुद्धिबळ संघटना

# इनर व्हील क्लब ऑफ गॅलेक्सी तर्फे विशेष शाळेतील मुलांना सायकल भेट

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**




नवीन पनवेल येथील डॉ. एन. एम. जाधव फाउंडेशन बौद्धिक अक्षम मुलांच्या शाळेला इनर व्हील क्लब ऑफ गॅलेक्सी तर्फे तीन सायकल भेट देण्यात आल्या. या उपक्रमामुळे शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

मुलांना विविध क्रीडा आणि स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी या सायकलींचा मोठा उपयोग होणार आहे. या माध्यमातून त्यांच्या शारीरिक आणि मानसिक विकासाला चालना मिळेल.

या सामाजिक उपक्रमासाठी जिल्हा अध्यक्ष डॉ. आशा देशपांडे, क्लब अध्यक्षा भूमिका परमार व क्लब सचिव दिपाली अडमुठे यांच्या पुढाकाराने हा सायकल वितरण कार्यक्रम पार पडला.

मानवतेचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाद्वारे इनर व्हील क्लब ऑफ गॅलेक्सीने समाजातील विशेष मुलांप्रती आपुलकी आणि सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण सादर केले.

शाळेतील मुलांसाठी इनर व्हील क्लब ऑफ गॅलेक्सीने तीन सायकल भेट दिल्या बद्दल डॉक्टर एन एम जाधव फाउंडेशन बौद्धिक अक्षय मुलांची विशेष शाळेच्या मुख्यध्यापिका सौ.श्रेया जाधव यांनी मानले आभार